ग्रहांकित

जानेवारी-१९८९ • ७ रुपये



ग्रहांकित

जानेवारी
१९८९

वार्षिक वर्गणी : ६० रुपये

किंमत : ७ रुपये



संपादक

चंद्रकांत ग. शेवाळे

उल्हास बा. पाटकर

मुखपृष्ठ

रमेश भारताल

प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

या अंकात

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक श्री. चंद्रकांत जी. शेवाळे यांनी आशू प्रिंटर्स, ३० (नवा) नारायण पेठ, पुणे ३०. येथे छापून चंद्रवल्लभ प्रकाशन, ६४४ अ, बुधवार पेठ, पुणे २ येथे प्रसिद्ध केले.

शंका समाधान

विं के. फडके

जो ज्योतिषशास्त्र शिकतो त्याचा वंशक्षय होतो असे काही लोक म्हणतात. ते कितपत खरे आहे ? त्याला काही शास्त्रीय आधार आहे का ? अशा प्रकारचा शाप या शास्त्राला कुणी दिला आहे का ?

सौ. उषा जोशी – उस्मानाबाद

वरील विधानाला कोणताही शास्त्रीय आधार आढळत नाही. आमच्या पाहण्यातील बहुतेक ज्योतिषांना चांगली दोन दोन, तीन तीन मुले आहेत ! आपण ज्याचा उल्लेख करता ते ' रमल ' ज्योतिषशास्त्र असावे. ' रमल ' ज्योतिष सांगणाऱ्याचा वंशक्षय होतो असा एक समज मात्र आपल्या समाजात दिसून येतो; परंतु तसा अनुभव मात्र आढळत नाही. पूर्वीच्या काळात चार दोन रमलशास्त्रांना संतति न झाल्यामुळे अशाप्रकारचा अपसमज निर्माण झाला असण्याची शक्यता आहे; परंतु तो नियम म्हणता येणार नाही. कोणतेही ज्ञान हे इतके पवित्र असते की, त्याच्या उपासकाला अशा प्रकारचा शाप कुणी देईल अशी कल्पना देखील करवत नाही !

मेदिनीय ज्योतिषात गोचरीचे ग्रह अशुभ असले तर त्यांचे अशुभत्व कमी करण्यासाठी त्या त्या ग्रहांचे जप अथवा शांति केल्यास त्यांचे परिणाम सौम्य होतील का ?

गोविंद कृष्ण बोरकर –रत्नापूर

हा प्रत्येकाच्या श्रध्देचा व विश्वासाचा प्रश्न आहे. शास्त्रानुसार सांगायचे तर याप्रश्नाचे उत्तर होकारार्थी द्यावे लागेल. आमच्या शास्त्रात नदी, पर्वत, ग्रह इ. ना देवतास्वरूप मानले आहे. नर्मदा, गंगा इ. नद्यांनी देवता स्वरूपात दर्शन दिल्याच्या विलक्षण हकीकती पूज्य टेंबेस्वामी किंवा शेगावचे श्री गजानन महाराज इ. सत्पुरुषांच्या चरित्रात वाचावयास मिळतात व जप हवनाच्या द्वारे या देवता प्रसन्न होतात असे शास्त्र सांगते. ग्रहांच्या शांती हवनामुळे घडलेले आश्चर्यकारक परिणाम पं. नारायण श्रीधर शास्त्री, वारे (नासिक) यांनी आपल्या ' ज्योतिषशास्त्र व त्याची उपयुक्तता ' या लेखात प्रसिद्ध केले असून सदर लेख ' चंद्रवल्लभ प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ' निवडक ग्रहांकित ' या पुस्तकात सुरुवातीलाच प्रसिद्ध केला आहे. आपण तो मुळातूनच वाचावा. आमचे वैयक्तिक मत विचारल्यास, ग्रहांच्या शांति हवनाचे निश्चितच सुपरिणाम घडून येतात. अधिक माहितीसाठी आपण ' शांतिकमलाकर, ' ' शांतिमयूर, ' किंवा ' शांतिसार ' यासारखे ग्रंथ पहावेत.

लग्नातील राहू विषयी तुमचा अनुभव काय ?

संध्या शिरवाडकर –पुणे

केवळ एखाद्या स्थानातील एका ग्रहावरून फार मोठे निर्णय घेणे शास्त्र दृष्टया योग्य होईल असे आम्हाला वाटत नाही. ग्रहांचे परिणाम हे सांघिक स्वरूपाचे असतात. त्याशिवाय तो ग्रह कोणत्या राशीत व नक्षत्रात आहे याचाही विचार जाणत्या ज्योतिषाने अवश्य केला पाहिजे. तथापि लग्नातील राहूची सर्वसामान्य फले अशी सांगता येतील की हा राहू व्यक्तीचा बांधा सडसडीत ठेवतो. अशा व्यक्तीला उपासनेची व विशेषत: जपजाप्याची आवड दिसून येते. त्यांच्या वैवाहिक जीवनात काही अडचणी, असंतोष दिसतो. (कारण सप्तमात केतू येतो) मात्र हा राहू व्यक्तीला मानसन्मान व प्रसंगी प्रसिद्धीही देतो. अशा व्यक्ती स्वत:च्या कर्तबगारीवर जगात पुढे येतात. त्यांना संतति अल्प असते. (एक किंवा दोन) पन्नाशी नंतर त्यांना विरक्ती येते.

उच्च ग्रहांची कोणकोणती फले जातकाला मिळतात ?

रविंद्र देसाई –धुळे

उच्च ग्रहांची फले थोडक्यात पुढील प्रमाणे सांगता येतील–

रवि – विद्वानात पूज्य, भाग्यवान धनवान व सुखी.

चंद्र – समाजात सन्मान मिळवणारा, चपळ आणि विलासी

मंगळ – बलवान, शूर, कर्तव्यनिष्ठ, धाडशी, उत्साही.

बुध – कुशल संपादक, प्रसिद्ध लेखक अथवा कवी, समाजात सन्मान मिळवणारा व बुद्धिवंतांशी मैत्री ठेवणारा.

गुरू – चतुर, सुशील, ऐश्वर्यवान, दयाळू, धार्मिक व सात्विक.

शुक्र – संगीतज्ज्ञ, कामकला निपुण, स्त्रियांचा सहवास प्रिय असणारा, विलासी, व भाग्यवान, (परंतु संसार सुख कमी)

शनि – शनि उच्च असेल तर त्याच्या महादशेत द्रव्यप्राप्ती होते व अचानक धनलाभ होतो.

राहू – द्रव्यलाभ होतो.

केतू – मोठ्या पदावर चढतो; परंतु मित्रांपासून धोका निर्माण होतो व त्यांच्या नादाने त्याचे द्रव्य नष्ट होते.

मंगळाला राहू शनिची तोड (दाब) पाहण्यात येते. अशी तोड पाहणे ज्योतिषशास्त्रदृष्टया योग्य आहे का ?

रा. सी. शेडगे - मुलुंड (पूर्व)

मंगळ-राहू व शनि हे तिघेही पापग्रह समजले जातात. यापैकी कोणत्याही एका ग्रहामुळे सप्तमस्थान बिघडू शकते. ज्या पत्रिकात मंगळ असतो त्या व्यक्तींचे सप्तमस्थान बिघडलेलेच असते हे आपणास ठाऊक आहेच. अशा परिस्थितीत वैवाहिक जोडीदाराच्या पत्रिकेत मंगळ नसेल तर शनि राहूचा दाब चालू शकतो. कारण त्यांचे परिणामही मंगळा इतकेच कडक असतात. म्हणूनच मंगळाला शनि किंवा राहूचा दाब पाहण्यात काही गैर आहे असे आम्हाला तरी वाटत नाही.


*

अर्मेनियातील (रशिया) प्रलयकारी भूकंप

लेखक – श्री. के. केळकर

वरील भूकंपाची पूर्वसूचना भूगर्भशास्त्रज्ञ, हवामानखाते भूकंप विशारद इत्यादीना कोणालाही कशा प्रकारे देता आली नाही. फक्त ज्योतिर्विद डॉ. श्री. के. केळकर यांनी भूकंपासहित नैसर्गिक आपत्तींना विशेष अभ्यास केला असल्याने तीन वर्षापूर्वी ' ग्रहांकित ' च्या दिवाळी अंकातस्पष्ट शब्दात सूचना दिली होती. आता डॉ. केळकर हे भूकंप कसा वर्तविला आणि आता पुढे धोका आहे काय हे सांगत आहेत.

– संपादक



दक्षिण रशियातील अर्मेनिया राज्यात बुधवार ता. ७ डिसेंबर रोजी प्रलंयकारी आणि प्रचंड भूकंप होऊन एक लाखाचेवर लोक ठार झाले. लेनिनकान आणि किरोवाकान शहरातील ५० टक्के इमारती कोसळून चार लाख लोक बेघर झाले. गेल्या ऐंशी वर्षात असा भूकंप झाला नाही असे सांगण्यात येते. १६६५ पासून जगात सोळा भूकंप विनाशकारी म्हणून समजण्यात येतात, त्यात वरील भूकंपाची गणना केली जाते असे नमूद करण्यात येते. जगातील अशा भीषण भूकंपाचो यादी दिली आहेच.

शास्त्रज्ञांची मते

वरील भूकंपाची पूर्वसूचना जगातील कोणत्याही शास्त्रज्ञाला देता येऊ नये याचे नवल वाटते. कारण भूकंपाचा अभ्यास करण्यासाठी गेल्या दोन शतकात धारातीर्थी प्रयत्न कोटयावधी रुपये । डॉलर्स खर्च होत आहेत, परंतु लाखाचेवर लोक मृत्युमुखी

भारतातील ऑगस्ट १९८८ तील भूकंप

६ व १२ ऑगस्टचे भूकंप उत्तर भारतात अक्षांश ८५ ते ८८ (पूर्व) व रेखांश २५ ते २८ चे दरम्यान झाले आहेत. याच प्रदेशात १९३५ मध्ये भूकंप झाले आहेत. अशा प्रदेशांची रास (लग्न) काढण्याची पद्धती आहे त्याप्रमाणे सायन तूळ येते. १९३५ मध्ये या तूळ राशीसमोर हर्शल होता आणि १९८८ मध्ये मंगळ मेषेत सहा महिने भ्रमण करणार असल्याने चोपन्न वर्षांनी भूकंप निर्माण झाले. काही शास्त्रज्ञांना ते १९८६–८७ मध्ये होतील असे वाटत होते. त्यावेळी मी १९८८ च्या उत्तरार्धाकडे बोट दाखवत असे. हे वर्ष ठामपणाने सांगण्याचे आणखी एक कारण म्हणजे भारताच्या पत्रिकेतील दशमावरील रवीवर प्ल्यूटो या ग्रहांचे अंशात्मक भ्रमण चालू होते व अद्याप तसेच चालू आहे. म्हणूनच भूकंपाचा धोका अद्याप म्हणजे मार्च १९८९ अखेर आहे, असेच म्हणावे लागते.

पडतात यांचा थोडाबहुत अंदाज सुद्धा करता येऊ नये याचे आश्चर्य वाटते. वरील घटना घडल्यानंतर अमेरिकेतील व इतर देशातील शास्त्रज्ञ म्हणतात की रशियन वैज्ञानिकांच्या जवळ भूकंपाचा अंदाज करावयास लागणारी अद्ययावत यंत्र सामुग्री नव्हती. अर्मेनिया भागातील घरबांधणी सदोष होती. कारणभूकंपापेक्षा इमारती पडल्यानेच विशेष मनुष्यहानी झाली असे स्थापत्य शास्त्रज्ञाना वाटते. काही म्हणतात की या भूकंपाची ताकत भयंकर होती. रिक्टर स्केल दहाचे वर्ष असावी असा त्यांचा अंदाज आहे लागोपाठ पंधराचेवर धक्के बसले स्पायटक हे शहर भूमीत गडप झाले असून त्याचा अवशेषसुद्धा भूकंपानंतर दिसला नाही. सर्व जगातून मदतीचा लोंढा रशियाकडे सतत चालू आहे.

रशियाची पत्रिका

रशियाची पत्रिका गेली पंचवीस वर्षे मी अभ्यासत आहे रशियाची रास निरयन कुंभ आहे अशी कल्पना आहे आणि ती चुकीची आहे असे माझे म्हणणे नाही; परंतु राशीबरोबर त्या देशाची खात्री लायक पत्रिका अभ्यासणे फार आवश्यक असते. निदान दोन्हीचा साकल्याने विचारात घेणे आवश्यक आहे तरच अशा घटनांचा अभ्यास करून भविष्य वर्तविणे शक्य आहे. अन्यथा ज्योतिषशास्त्रावर आधारलेले अंदाज चुकतात व त्यामुळे शास्त्राला कमीपणा येतो आणि हे शास्त्रच नाही अशा प्रकारची टीका या शास्त्रावर उघडपणे चिकित्सक करतात. ज्योतिर्विदांनी शास्त्र प्रचिती दाखविण्यासाठी वरील बाबींचा नीट अभ्यास करावयास पाहिजे.

रशियाची पत्रिका मी सोबत दिली आहेच. या पत्रिकेचे द्वारे १९६३ साली निकिता क्रुचेव्ह आक्टोबर १९६४ नंतर त्या पदावर रहाणार नाहीत हे केलेले भाकित सोळा आक्टोबर १९६४ला तंतोतंत बरोबर ठरले. त्यानंतर नेतेपणातील बदलाची भाकिते बरोबर येत गेली. नुकत्याच रशियात झालेल्या आमूलाग्र बदलाची कल्पना 'ग्रहांकित' 'संदेश पंचांग' (अहमदाबाद) इत्यादी ठिकाणी प्रसिद्ध झालेल्या लेखात स्पष्टपणे दिलेली होती. वाचकांनी ते अंक पुन्हा नजरेखालून घालावेत.

शनी कक्षेपलिकडील ग्रहांचा अभ्यास व्हावा

कोणत्याही शास्त्रात अद्ययावतपणा आणणे आवश्यक आहे. याचा अर्थ भारतातील वराहमिहिरादी महान ज्योतिर्विदाबद्दल आम्हाला आदर नाही अशी चुकीची कल्पना भारतातील काही ज्योतिर्विद व्याख्यांनात अगर लेखात करून देतात. अर्थात अशी टीका थोड्या बहुत प्रमाणात ती माझ्यावरच रोखलेली असते हे मी जाणून आहे. टीका झाली म्हणून आमचा अभ्यास कमी पडणार नाही

आतापर्यंत झालेले मोठे भूकंप

साल	ठिकाण	मनुष्यहानी
१५५६	शानझी, चीन	८३०,०००
१७३७	कलकत्ता, भारत	३००,०००
५२६ इ. स. पूर्वी	अन्टीओरा, सिरिया	२५०,०००
१९७६	सीयानचीन, चीन	२४२,०००
१७०३	टोकिओ, जपान	२००,०००
१९२०	गानस्, चीन	१८०,०००
१७३०	जपान	१३७,०००
१२९०	हावीई, चीन	१००,०००
१७३१	बिजीग, चीन	१००,०००
१९२३	टोकिओ, जपान	९९,०००
१६९३	कंटानिया, इटली	६०,०००
१७५५	लिसबन, पोतूर्गाल	६०,०००

कारण 'अनुभूती प्रदं ज्योतिषं शास्त्रउत्तमम्' असे बोधवाक्य आमच्याच ज्योतिर्विदांनी बोलून दाखविले आहे. त्यात आम्ही काही वेगळे अगर चुकीचे करतो आहोत असे समजण्याचे कारण नाही.

सोळाव्या शतकापर्यंत डोळ्यांनी दिसणाऱ्या ग्रहांचा ग्रहगणितात किंवा ज्योतिषात उपयोग होत असे. दुर्बिणीचा शोध लागल्यापासून हर्षल. नेपच्यून व प्ल्यूटो यांचा शोध लागला. आता तर दहावा ग्रह सापडला असून त्याचाही नजिकच्या काळात उपयोग करावा लागणार आहे. मेदिनिय ज्योतिष शाखेत पारंगत होऊ पाहणाऱ्या ज्योतिर्विदांनी सोवळेपणा सोडून देऊन ज्ञात असलेल्या सर्व ग्रहांचा फलितासाठी उपयोग करावा अशी मी कळकळीची विनंती करत आहे.

चतुर्थ व अष्टमस्थाने

रशियाचा भूकंप मी प्रथमच चुकून किंवा योगायोगाने वर्तविला आहे जसे समजू नये या पूर्वी १९६७ सालातील कोयनेचा भूकंप तारिखवार दोन तीन महिने आधी वर्तविला होता. त्यानंतर विशेष अभ्यास करून चतुर्थ व अष्टमस्थानातील ग्रहणे व इतर अशुभ ग्रहांची भ्रमणे लक्षात घेतली. जपान व लास् एंजलीस या प्रदेशातील

वीस वीस भूकंपाचा अभ्यास करून सॅन फ्रन्सिसको (अमेरिका) येथे झालेल्या आठव्या भुकंप जागतिक परिषदेला एक निबंध सादर केल. या निबंधातील सत्यता तेथील संयोजकाला पटल्याने त्यांनी मला पाचारण केले व मी स्वखर्चाने हजर राहिलो त्यामुळे इतर शास्त्रज्ञाना भूकंपाबद्दल काय वाटते हे समजावून घेता आले. काही भूकंप शास्त्रज्ञांना असे वाटते की मी या झालेल्या परिषदेचा सभासद म्हणून गणला जात नाही. तसे माझे म्हणणेही नाही. निष्कारण अशा तऱ्हेची टीका त्यांनी करू नये. या निबंधात १९८६-८७ साली होणाऱ्या जपानमधील भूकंपाची कल्पना दिली होती त्यामानाने अमेरीकेबाबतचे अंदाज तितकेसे बरोबर ठरले नाहीत.

रशियाच्या पत्रिकेतील चतुर्थ स्थानाकडे लक्ष द्या. चतुर्थ स्थान बाण करून दाखविले आहे (ही पत्रिका सायन पद्धतीप्रमाणे आहे.) चतुर्थात रवी चौदा अंशात असून तेथेच बुध सोळा अंशात आहे. लग्नाजवळ तीन ग्रह आहेत. नेपच्यून सात अंशात असून तो चतुर्थाशी केंद्र करतो. शनी चौदा अंशात असून तो रवीशी केन्द्र करतो चंद्र सोळा अंशात असून तो बुधाशी केंद्र करतो. सप्तमात हर्षल वीस अंशात आहे.

प्ल्यूटो – अणुशक्तीचा व विध्वंसक ग्रह आहे.

प्ल्यूटो हा रवी मालेतील शेवटचा माहीत असलेला ग्रह आहे. त्याच्या गुणधर्मांचा अभ्यास अद्याप चालू आहे. अर्थात आतापर्यंत झालेल्या निरीक्षणानुसार फार मोठ्या प्रमाणावर विध्वंस करणारा आहे 'पहिले नष्ट झाल्यावर मगच नवीन होणार' अशी याची ख्याती आहे विस्तारभयास्तव त्याच्या गुणधर्मांची विशेष चर्चा करत नाही.

सहा जून १९८३ रोजी प्ल्युटो सायन वृश्चिकेत आला. तेव्हापासून हळूहळू पुढे सरकत फेब्रुवारी १९८६ ला सात अंशात म्हणजे चतुर्थ बिंदू नजीक व लग्नाजवळील नेपच्यूनच्या केन्द्रात आला. हे लक्षात घेऊन अण्वस्त्राचा स्फोट नजर चुकीने अगर स्वाभाविकपणे होण्याची शक्यता वर्तवली होती. त्याप्रमाणे एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात म्हणजे पाच-सहा अंशात प्ल्यूटो असताना व १९८६ च्या फेब्रुवारीतील शनी-मंगळ युती होऊन गेल्यावर चेनिर्वालच्या अणुशक्ती रिॲक्टरचा स्फोट होऊन भयंकर विध्वस झाला. युरोपातील रशियाच्या हद्दीच्या जवळ असलेल्या राष्ट्रांना फॉलआऊटचा त्रास झालाच.

हा प्ल्युटो गोचरात रवि नजीक १९८८ मध्ये येणार हे निश्चित होतेच. १९८८ साली मंगळाचे सायन मेष राशींतील भ्रमण अष्टमात जुलै ते डिसेंबर होणार होते. या विषयावर ग्रहांकित प्रमाणे अस्ट्रॉलॉजीकल मॅगझीनच्या ऑक्टोबर १९८६ च्या अंकात खुलासेवार लेख लिहलेला आहेच. प्ल्यूटोच्या विध्वंसक गुणधर्मांचा विचार

रशिया

रशियाची रास निरयन कुंभ असली तरी अनुमानिक पत्रिकेत सिंहेचा बारावा अंश उदित आहे. चतुर्थावरील शनीचे भ्रमण आता संपले आहे. प्लूटो सुध्दा चतुर्थावरून पुढे सरकला आहे वर्षभर गुरूचे भ्रमण दशम लाभातून होणार असल्याने रशियाचे आंतरराष्ट्रीय जगातील वर्चस्व वाढते रहाणार आहे. फक्त एकच अशुभ योग आहे तो म्हणजे मूळच्या चतुर्थावरील वृश्चिकेतील रवी जवळ प्लुटोचे भ्रमण रहाणार आहे. अर्थात अंशात्मक योग १९९० च्या फेब्रुवारीत व्हावा त्यामुळे अणवस्त्रशास्त्र निर्मिती बाबत सावध रहावे चेर्नोबल सारखी एखादी घटना उत्तरार्धात होण्याची शक्यता आहे कारण जुलै ते डिसेंबर अखेर मंगळ अष्टमात राहून तो मूळच्या मंगळासमोर आहे. सध्याच्या अध्यक्षाच्या विरुध्द एखादा प्लॅन होण्याची शक्यता आहे. अर्थात या विधानाची सत्यता कळण्यास इतर राष्ट्रांना बराच अवधी लागावा.

(ग्रहांकित, दिवाळी १९८७)

करूनच १९८६ च्या दिवाळी अंकात अशी सूचना दिली होती की' भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याची तयारी (रशियाने) ठेवावी. एक छोटासा भूकंप सप्टेंबर १९८७ मध्ये रूमानिया प्रदेशात झाला. माझ्या अंदाजाला रिएक्टरच्या स्फोटापासून भक्कमपण आला. सात डिसेंबरला भूकंप झाला. त्यादिवशी प्लुटो वृश्चिकेत (१३·४७ अंशात) असून तो मूळच्या रवि जवळ व लग्नातील शनिच्या केन्द्रात होता. मंगळ अष्टमातच होता. सात डिसेंबरचा चंद्रही त्याच अंशात होता. सहा डिसेंबरला चंद्र प्लुटो युती झाली होती. अशा प्रकारे भयंकर स्वरूपाचे ग्रहमान असल्यावर इतका प्रचंड आणि विनाशकाली भूकंप न झाला तरच विशेष. इतरत्र नोव्हेंबर-डिसेंबर १९८८ महिन्याचा उल्लेख केलेला आहे.

इतर शास्त्रज्ञांच्या अभ्यासापेक्षा ग्रह गणिताच्या आधारे वर्तविलेले भविष्य कसे अचूक बरोबर येते हे वाचकांनी, अभ्यासूंनी व शास्त्राज्ञांनी समजावून घ्यावे. एवढीच नम्र विनंती आहे. अशा भाकितामुळे द्रव्यलाभ होत नसून शास्त्र प्रचिती येत असते.

धोका संपला नाही

एवढा मोठा भूकंप झाल्यावर पुन्हा तसा धोका त्याच प्रदेशात निर्माण होत नाही असे सर्व साधारणपणे शास्त्रज्ञांचे म्हणणे असते.

कारण भूपृष्ठाखाली दबलेली शक्ती (एनर्जी) एकदा बाहेर पडल्या वर अशा शक्तीची क्षमता कमी झालेली असते. फक्त 'आफ्टर ट्रेमार' म्हणून किरकोळ धक्के बसू शकतात

अशा तऱ्हेची कल्पना ज्योतिषशास्त्रात नसते. कारण पूर्वी प्रमाणे भयंकर ग्रहमान तयार झाले तर तशा धोक्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीसुद्धा ज्योतिर्विदांनी इतर शास्त्रज्ञांच्याकडे दुर्लक्ष करावे असे नाही. कारण प्रत्येक शास्त्रज्ञांनी अगर संशोधकांनी विचार करून त्यांची मते मांडलेली असतात. तेव्हा त्यांचे विचार व ग्रहभ्रमणामुळे निर्माण होणारे परिणाम यांची सुसंगती साधता आली तर "अधिकस्य अधिक फल" म्हणून फलितात निश्चितता आणता येईल.

प्ल्यूटोचे वृश्चिक राशीतील भ्रमण आता पुढे चालू रहाणार आहे. ऑक्टोबर १९८९ मध्ये पुन्हा तो मूळच्या रवीवर येईल. नोव्हेंबर-डिसेंबर मधील सोळा अंशात येऊन बुधाशी युती व लग्ना-जवळील चंद्राशी केन्द्र करेल तत्पूर्वी राहू सप्तमावर राहील. ऑगस्ट १७ चे चंद्र ग्रहण सप्तमावरील हर्षलावर असेल तर नऊ फेब्रुवारी १९८९ चंद्र ग्रहण लग्नावर असेल. तीस नोव्हेंबर १९८९ च्या सुमारास त्याच वरील म्हणजे वृश्चिक सोळा अंशांत प्लुटोशी युती करेल. मार्च १९९० मध्ये मंगळ सप्तमावर राहील.

वरील सर्व ग्रहमानाचा विचार करता भूकंपासारख्या आणखी एखाद्या नैसर्गिक आपत्तीचा अगर अण्वस्त्र स्फोटाचा धोका फेब्रुवारी १९८९, जुलै १९८९ व शेवटी नोव्हेंबर १९८९ ते मार्च १९९० पर्यंत संपला आहे असे ज्योतिषशास्त्रदृष्ट्या म्हणता येत नाही. इतर शास्त्रज्ञांनी त्यांच्या पद्धतीने अभ्यास करून वर वर्णन केल्याप्रमाणे रशिला धोका आहे अगर नाही याचा [विचार करावा व त्याचे निष्कर्ष आगाऊ वर्तवावेत अशी विनंती आहे. म्हणजे धोका निर्माण झाला तर तोंड देण्याची तयारी] रशीयाला करता येईल. अगर रशियातील जनता धास्तावलेली रहाणार नाही.

काही उणीवा

कोणतीही पद्धती परिपूर्ण नसते. त्यात काही दोष असतात उणीवा असतात. हे टाळावयाचे असेल तर मेदिनीय ज्योतिष शाखे-तल्या निष्णात ज्योतिर्विदाबरोबर इतर शास्त्रज्ञांनी चर्चा केली, सुसंवाद केला तर उणीवा व अपरिपूर्णता निश्चित कमी होईल व भूकंपासारख्या अक्राळ विक्राळ नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना देता येईल.

ज्योतिष शास्त्राद्वारे कोणत्या देशात भूकंप होईल हे बऱ्याच अंशाने सांगता येईल, परंतु त्या राष्ट्राच्या कोणत्या प्रदेशात अगर कोणत्या अक्षांश-रेखांशावर होईल हे सांगणे आवश्यक आहे. तरच मनुष्यहानी टाळता येईल. या मेदिनीय शाखेत गोडी असणा-रांनी पुढे यावे व त्याचे विचार धीटपणाने लोकांपुढे ठेवावेत म्हणजे शास्त्र प्रगतीला वाव मिळेल व मानवाचे खऱ्या अर्थाने कल्याण साधता येईल.

रशिया

एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात चेर्नोबील रिॲक्टर वितळल्याने फारच मोठी आपत्ती रशियावर व त्याच बरो-बर युरोपातील राष्ट्रात निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीपेक्षा हे एक मानव निर्मित संकट आहे. त्याचबरोबर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात भूकंपाने सुध्दा जबरदस्त धक्का दिला. या संबंधात ग्रहांकित दिपावली १९८६ च्या १०७ पानावर चौकट करून सूचना दिली होती. वरील घटना वर्तविताना रशियाची पत्रिका व धुमकेतूचे पहिले दृश्य स्वरूप लक्षात घेतले होते. यापूर्वी मी रशियाची पत्रिका ग्रहांकित मध्ये अनेक वेळा प्रसिद्ध केलेली आहे. अद्याप प्ल्यूटो चतुर्थावर आहे व तो रवी बुधाला जानेवारी १९८९ मध्ये भेटणार आहे. म्हणजे १९८७ १९८८ व १९८९ ही वर्षे रशियाच्या दृष्टीने फार महत्वाची आहेत. नैसर्गिक व राजकीय आपत्ती अकस्मात निर्माण व्हाव्यात. त्याचा महत्त्वाचा काळ अमावस्या व पौर्णिमा पत्रि-कावरून व ग्रहांचे गोचर भ्रमणावरून निश्चित करता येईल. मेदिनीय शाखेचा विशेष अभ्यास करणारांनी ते ताडून पहावे. राजकीय दृष्टया एक नवीन पर्वकालाला रशियात सुरुवात होणार आहे. माझ्या भकिताची सत्यता १९९३ साली जगाला दिसून येईल.

चालू व पुढील वर्षात रशियाने सर्व अटॉमीक रिॲक्ट-रची काळजी ध्यावी. त्याचप्रमाणे भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याची तयारी ठेवावी. चीनला या आप-त्तीचा फायदा उठवून पुढे सरकता येईल. रशियावर अव-लंबून रहाणाऱ्या सर्व राष्ट्रांनी आगामी चार पाच वर्षात होणाऱ्या घटनांची नोंद करून घेणे आवश्यक ठरेल.

(ग्रहांकित, दिवाळी १९८६)

देदिप्यमान यशाचा मानकरी कु. मंगेश म्हसकर

लेखक : सौ. अलका सोलापूरकर

योगेश अपार्टमेंट, १ ला मजला, राम मारुती रोड विस्तारीत, कमल सोसायटी समोर नौपाडा, ठाणे ४००६०२.

दिनांक २० जून १९८८ च्या संध्याकाळी दूरदर्शनवरील बातम्यात जोगेश्वरीच्या गंडभीर हायस्कूलचा विद्यार्थी कु. मंगेश म्हसकर दहावीच्या परीक्षेत पहिला आल्याचे सांगण्यात आले. ९६ टक्के गुण मिळाले होते. कधीही वाचण्यात किंवा ऐकण्यात न आलेल्या जोगेश्वरीच्या गंडभीर हायस्कूलचा विद्यार्थी सर्वप्रथम आला ह्या बद्दल लोक आश्चर्य व्यक्त करीत होते. सर्व प्रस्थापितांना धक्का देणारी बातमी होती

पार्ले–टिळक, बालमोहन किंवा चिकित्सक अशा कुठल्यातरी तोलामोलाच्या शाळेतला, पप्पा–मम्मीच्या लाडात अभ्यासाची भरपूर उजळणी केलेला विद्यार्थी सर्वप्रथम येणार अशीच सर्वांची अपेक्षा होती. सध्याच्या शैक्षणिक वातावरणात अशी अपेक्षा करणे काही गैर नव्हते. कु. मंगेश आणि त्याच्या गंडभीर शाळेने सर्वच बाबतीत प्रस्थापितांचे अंदाज खोटे ठरविले.


गजबजलेल्या कामगार वस्तीत, झोपडपट्टी वजा चाळीत, १०×८ च्या खोलीत राहणारा, अशिक्षित आई–वडील, घरात, फक्त मोठा भाऊ कॉलेजशिक्षणापर्यंत पोहचलेला, कुठल्याही खाजगी क्लासला न जाणारा, घरात अभ्यासासाठी पोषक वातावरण नसतानाही आपल्याच घरात अभ्यास करणारा, सहामाही नंतर एक विषय बदलणारा व नवीन विषय उरल्या–सुरल्या चार महिन्यात आपल्याच शाळेतल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आत्मसात करणारा कु. मंगेश म्हसकर हा खरोखरच सर्वांच्या कौतुकाचा विषय झाला नसता तरच नवल ?

कु. मंगेशवर जो कौतुकाचा वर्षाव झाला ते पाहून मन भरून आलं. आपल्या समाजाला अजून जाग आहे हे पाहून समाधान वाटलं. भ्रष्टाचाराच्या ह्या युगात कु. मंगेशचे हे यश अधिकच गौरवास्पद आहे. सर्व संकेतांना धक्का देऊन सर्वप्रथम येणाऱ्या हुशार मंगेशची पत्रिका आपण करावी अशी प्रबळ इच्छा झाली; म्हणून हा सर्व खटाटोप.


कु. मंगेशचा जन्म १३ मार्च १९७१ रोजी मुंबईत संध्याकाळी ६ वा. ५० मि. झाला. त्यावेळी पूर्व क्षितिजावर ० अंश, १५ कलांवर कन्या लग्न उदीत होत होते. कु. मंगेशच्या कुंडलीत सर्वच भाव शून्य अंशात आहेत आणि त्याचमुळे जी लग्न कुंडली तीच भावचलीत कुंडली राहते. कु. मंगेशच्या पत्रिकेत लग्नी चंद्र म्हणजेच कन्या रास असल्यामुळे राशी कुंडली पण तीच रहाते. ज्यावेळी भावचलीत कुंडलीत सर्व भाव उदीत अंशात असतात अशावेळी अशा कुंडलीला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होते.

कु. मंगेशच्या ग्रहाच्या स्थितीकडे जरा आपण पाहू या.

लग्न कुंडली



नवमांश कुंडली



भावारंभ बिंदू	रा. अं. कला	स्पष्ट ग्रह	रा. अं. कला
स्पष्ट लग्न	५–००–१५	स्पष्ट रवि	–१०–२८–५१
–"–द्वि भाव	५–२९–१६	–"–चंद्र	–०५–१४–३४
–"–तृ–"–	७–००–१६	–"–मंगळ	–०८–०७–१४
–"–च.–"–	८–००–१६	–"–बुध	–११–०५–१७
–"–पं.–"–	९–००–१६	–"–गुरू	–०७–१२–५०
–"–ष–"–	१०–००–१६	–"–शुक्र	–०९–१७–३५
–"–स.–"–	११–००–१५	–"–शनि	–००–२४–५४
–"–अ.–"–	११–२९–१६	–"–राहू	–०९–२९–२३

भावारंभ बिंदू		स्पष्ट ग्रह	
स्पष्ट न. भाव–	०१–००–१६	स्पष्ट केतू	०३–२९–२३
–"–द.–"	०२–००–१६	–"– हर्षल	–०५–१९–२१ (व)
"–"ए. द.–"	–०३–००–१६	–"– नेप	–०७–०९–३७ (व)
–"–द्वा. द–"	–०५–००–१६	–"–प्लूटो	–०५–०५–२१ (व)

ह्या पत्रिकेत कन्या लग्न बिंदूजवळ प्लुटो हा ग्रह असल्यामुळे जातकाची बौध्दिक पातळी उंचावतो. जातकाला प्लुटोचा बौद्धीक दृष्टचा उपयोग झाला आहे. चंद्र आणि प्लुटोच्या युतिमुळे त्याला साहित्याची आवड असेल. पण विज्ञानाकडे त्याचा जास्त ओढा असेल. लग्नी असलेला हर्षल सुद्धा विलक्षण बुद्धिमत्ता देतो आणि अनेक विषयांची आवड निर्माण करतो पण जातकाचा स्वभाव फार लहरी बनवितो. कधी कुठली गोष्ट करायची ठरेल हे वर्तविणे कठीण, पण चंद्र स्वतःच्याच हस्त नक्षत्रात (द्वितीय चरण) असल्यामुळे तो स्वभावावर अनुकूल परिणाम करतो. अशा व्यक्तीला नेहमी आपल्या घरच्या माणसांबद्दल, मित्रांबद्दल व इतर जे कोणी जवळचे असतात त्यांच्याबद्दल आत्मीयता वाटत असते. लग्नी असलेल्या चंद्राने सुद्धा बौध्दिक पातळी वाढवलेली आहे कारण हाच चंद्र नवमांश कुंडलीत 'उच्च नवमांशी झालेला आहे व योगायोग असा की तो नवमांश कुंडलीत पंचमात उच्च नवमाशांत पडलेला आहे आणि हाच चंद्र विज्ञान व अणुविज्ञान क्षेत्रात आवड निर्माण करणार आहे. कु. मंगेशच्या पत्रिकेत चंद्र–शुक्राचा नव पंचमयोग झालेला आहे. हा योग कलेची आवड निर्माण करतो व अचानक पैसा मिळवून द्यायला हा योग कारणीभूत ठरला आहे. नेपच्यून बुधाचा नवपंचम योग खूप बोलका आहे. बुध–प्लुटो समसप्तक योग आणि चंद्र–नेपच्यून लाभ योग अणु–विज्ञान क्षेत्राकडे ओढा निर्माण करतो. ह्या विषयात संशोधन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण नेपच्यून हा वृश्चिक राशीत म्हणजेच मंगळाच्या घरात पडलेला आहे. त्याला इथे गुरूची साथ आहे आणि त्याची युतिपण आहे. गुरू–नेपच्यून युति ही ज्ञानाच्या कामात चांगले यश मिळवून देते.

नवमांश कुंडली जर आपण पाहिली तर असे दिसेल की रवी, मंगळ, नेपच्यून, हर्षल, शुक्र ह्या सर्व ग्रहांनी मिथुन राशीचे नवमांशात म्हणजेच बुधाच्या बौद्धिक राशीत वर्णी लावलेली आहे. रवि षष्टात असल्यामुळे मंगेशची प्रकृती तोला–मोलाची राहील. शनि ग्रह मंगळाच्या म्हणजेच त्याच्या शत्रु राशीत असल्याकारणाने त्याला विशेष महत्त्व देण्याची गरज नाही. नवमांश कुंडलीत चंद्र उच्च नवमांशी म्हणजेच वृषभ राशीत पंचम स्थानात पडतो आणि म्हणूनच ह्या चंद्राला फार महत्त्व प्राप्त होते. चंद्र हा मूळचाच संशोधक असल्यामुळे जातकाला संशोधन करण्याची आवड निर्माण करतो.

चलित ग्रहांवर जर आपण दृष्टी टाकली तर असे आढळून येईल की २० जूनला शनि, हर्षल व नेपच्यून हे मंगेशच्या चतुर्थ स्थानावरून भ्रमण करीत होते. कु. मंगेशच्या यशाचा गौरव महाराष्ट्र सरकार व जनतेने त्याला स्वतःच्या मालकीचे घर देऊन केले हे आपल्या सर्वांना माहीत आहेच. चलित गुरुचे भाग्य स्थानातून भ्रमण आणि कन्या राशीचा नववा गुरू हेही मंगेशला भाग्याचे ठरले. ज्योतिषशास्त्राच्या सर्व–साधारण संकेताप्रमाणे राशीला असलेला विषम गुरू (पाचवा, 'सातवा, नववा किंवा अकरावा) काहीतरी अविस्मरणीय घटना घडवून आणतो.

कु. मंगेशला जन्मतः चंद्र महादशा होती. (भोग्य ६ वर्षे ६ महिने आणि २७ दिवस) ऑक्टोबर १९८४ साली त्याला राहूची महादशा सुरू झाली. राहूच्या महादशेत आणि गुरुच्या अंतर्दशेत त्याला हे यश प्राप्त झाले आहे. राहू जरी त्याच्या पंचमात असला तरी तो मकरेच्या म्हणजेच सम राशीचा असल्यामुळे शुभ झालेला आहे. नवमांश कुंडलीत हा ग्रह कन्येचा होतो व भाग्यात पडतो आणि म्हणून तोही शुभ ठरतो.

बारावीच्या परीक्षेतही कु. मंगेशला भरघोस यश मिळेल, पण त्यापुढे यशोमंदिरावर पोहचण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागेल.

ज्योतिषशास्त्राचे ठोकताळे असतात. त्याची प्रचिती पहाण्यासाठी आणि ज्योतिषशास्त्रातील शिकाऊ उमेदवारांना उपयोग व्हावा म्हणून हा प्रयत्न.

मेडिकल अॅस्ट्रॉलॉजी

लेखक – डॉ. कु. भावना चंद्रकांत मेहता
शाहुपुरी ५ वी गल्ली, कोल्हापूर.

आजचे युग हे अणुयुग तसेच जेटयुग पण आहे. आज २१ व्या शतकाकडे वाटचाल करणारा मानव हा स्वतंत्र बुध्दिचा झाला असून घडणाऱ्या घटनेची कारणे तो शोधू इच्छितो. असा हा आधुनिक जगातील अत्याधुनिक मानव विज्ञानाच्या जोरावर सर्व भौतिक सुखांचा उपभोग घेत आहे. संपत्ती आणि सुखसोयी यांच्या आसनावर तो विराजमान झाला आहे. पण तरी तो सुखी आहे का? याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल आणि हे उत्तर आपल्याला युरोप, अमेरिकेतील आपल्या डोळ्या देखत स्वैरपणे फिरणारे हिप्पीच देऊ शकतील. म्हणूनच मानवाला आज भौतिक सुखाबरोबर आंतरिक सुखाचीही गरज आहे की जे आपणाला धर्मापासून मिळते आणि हे भौतिक सुख देणारे विज्ञान व आंतरिक किंवा मानसिक सुख देणारा धर्म या दोघांचा सुवर्णमध्य म्हणजे ज्योतिषशास्त्र होय.

सर्व सामान्य लोकांचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असतो तो म्हणजे पैसा! त्यानंतर प्रमोशन, बंगला, मोटार इत्यादि! अखेर शेवटी प्रश्न येतो तो स्वतःच्या प्रकृतीचा; परंतु प्रकृतीच जर ठीक नसेल तर मिळालेल्या पैशाचा काय उपयोग! म्हणूनच सर्वांत महत्त्वाचे असे शरीरस्वास्थ व आरोग्य! आणि हे जाणून घेण्यासाठी वैद्यकीय ज्योतिषशास्त्र' म्हणजेच मेडिकल अॅस्ट्रॉलॉजी जाणून घेणे आवश्यक आहे.

भविष्यकाळाची चाहूल समजण्यासाठी जी काही शास्त्रे उपलब्ध आहेत त्यात कुंडलीशास्त्र, हस्तसामुद्रिक शास्त्र, रमल शास्त्र, आकडे शास्त्र वगैरेंचा समावेश करता येईल.

हस्तसामुद्रिक शास्त्र हे एक विश्वसनीय शास्त्र असून हाताची त्वचा, रंग, आकार, त्याची ठेवण मुलायमता, कठीणपणा, त्यावरील रेषा, उंचवटे, बोटांची टोके, पेरी, त्यामधील ग्रंथी, नखे, त्याचा रंग, आकार, त्यावरील रेषा, बिंदू, हातावरील व बोटांच्या टोकावरील तंतुरेषांचा अर्थ समजावून घेतला व त्याचा जर व्यवहारात उपयोग केला तरच या शास्त्राचे चीज झाले असे म्हणता येईल.

हाताचा गुलावी रंग उत्तम आरोग्य संपदा दर्शवतो. जर लाल भडक रंग असेल तर त्यांना मधुमेह, वाढलेला रक्तदाब व संधिवाताची शक्यता दर्शवितो. हाताचा फक्त एक भाग लाल असेल तर त्या व्यक्तींना यकृताचा विकार, क्षय, व त्यांचेमध्ये जीवनसत्वांचा अभाव असू शकेल. हाताचा रंग जर निळसर असेल तर त्यांना हृदय विकार व हाताच्या रक्त वाहिन्यांचा विकार दर्शवितो. पांढुरका रंग असेल तर पंडु रोग व मानसिक त्रास दर्शवितो.

हातावरील आयुरेषा–शारीरिक स्वास्थ, मस्तकरेषा–मानसिक स्वास्थ व हृदयरेषा, भावनिक स्वास्थ दर्शविते. कोणतीही रेषा जर सखोल, गुलावी, बारीक योग्य प्रमाणात असेल तर ती रेषा उत्तम समजावी. त्यावरील बिंदू, आडव्यारेषा, क्रॉस, यव असेल तर ते त्रासदायक समजावे व त्या त्या रेषेप्रमाणे बरे वाईट परिणाम घडण्याची शक्यता असते.

आयुष्यरेषा मध्येच तुटलेली असेल किंवा दुसरी आडवीरेषा तिला छेदत असेल, त्या रेषेवर यव, काळा बिंदू, जाळी वगैरे चिन्हे असतील तर त्या त्या वर्षी घात होण्याची शक्यता असते. आयुष्य रेषेवर असलेला काळा डाग त्या वयोमानाने डोळयांचा विकार किंवा तीव्र ताप येण्याची शक्यता असते, तर निळा बिंदू कृमीचा त्रास दर्शवतो. आयुष्य रेषेवरील जाळी त्या वयोमानाने दम्याचा त्रास होण्याचा संभव असतो तसेच डिपथेरिया (DIPHTHERIA) होण्याची शक्यता दर्शविते.

आयुष्य रेषा छोटया दोन रेषांनी बनली असेल तर यकृत विकार व जाड आयुष्य रेषा अपचन दर्शविते. शुक्राला दाबून टाकणारी रेषा न्यूनता दाखविते. आयुष्य रेषेवरील नक्षत्र एखादी

शस्त्रक्रिया, त्यावरील चौकोन असल्यास वाचण्याची शक्यता. स्त्रियांच्या हातावरील आयुष्य रेषेला चंद्रावरील रेषा मिळत असेल तर सिझरींनची शक्यता असते.

साखळी युक्त मस्तक रेषा, चंद्रावर जाणारी मस्तक रेषा व आयुष्य रेषेच्या आतून उगम पावणारी मस्तक रेषा मानसिक दौर्बल्य दाखवते. साखळीयुक्त हृदयरेषा दम्याचा विकार दर्शविते. तुटक बुध रेषा यकृताचा विकार दर्शविते.

हातावरील उंचवटे – गुरू – शुक्र, शनी, रवी, चंद्र, मंगळ या वरूनही आरोग्याचा बोध होतो. उंचवटा, सुबक, गुलाबी व उठावदार असेल तर तो तो ग्रह चांगला. त्यावर खळगा, तसेच डाग व बिंदू, फुली अशा प्रकारची चिन्हे असल्यास तो ग्रह बिघडला असून त्याचा परिणाम आरोग्यावर होतो. ग्रह बिघडला असल्यास त्या त्या ग्रहानुसार खालीलप्रमाणे विशिष्ट आजार होण्याची शक्यता असते.

गुरू – मधुमेह, जलोदर, यकृत व पित्ताशयाचे विकार.

शनी – लकवा, कर्करोग, हत्तीपाय, मूळव्याध, हाडांचे विकार मुतखडा वगैरे.

रवी – डोकेदुखी, अस्थिरोग, त्वचारोग, डोळ्यांचे विकार

बुध – ज्ञानतंतूचे रोग, पोलिओ, बहिरेपणा, वाणीदोष चेहऱ्यावरील मुरुमे.

मंगळ – अकस्मात भाजणे, रक्ताचा विकार, खाज खुजली रक्तदाब.

चंद्र – मानसिक विकार, सूज येणे, क्षयरोग, प्लुरसी गर्भाशयाचे रोग, अॅलर्जी.

शुक्र – मधुमेह, मोतीबिंदू, गुप्तरोग, प्रोस्टेट ग्रंथी विकार, कृमी, लिव्हरचे विकार.

हाताच्या बोटावरील चक्र, शंख, शुक्ती हे सर्व तंतूमय रेषापासून बनलेले असतात व त्यावरून हृदयविकार, RUBELLA SYNDRAME CONSTITIONAL NEUROSIS वगैरे रोग ओळखता येतात.

कुंडली शास्त्र –

जातकाच्या जन्मवेळी आकाशातील ग्रहांची जी स्थिती असते. ती बारा भागात दाखविली जाते. हा जो नकाशा आहे यालाच जन्मकुंडली म्हणतात. यात १२ भाग असून १२ राशी दाखवितात. या बारा राशीचा शरीरावरील भागावर अंमल असतो तो येणे प्रमाणे –

पहिले स्थान – मस्तक, मन, मेंदू.
दुसरे स्थान – उजवा डोळा, दात, बोटे, नख, चेहरा.
तिसरे स्थान – मान, गळा, श्वसनक्रिया, कान, हात.
चौथे स्थान – हृदय, छाती, फुप्फुस, रक्त, खांदे.
पाचवे स्थान – वरील पोट, पाठ, कुशी.
सहावे स्थान – पोटाखालील भाग, बेंबी, उदरभाग.
सातवे स्थान – पोटाखालील भाग, किडनी.
आठवे स्थान – जननेंद्रिये, रक्त, लघवी, पाय.
नववे स्थान – मांड्या, जांघ, मांस.
दहावे स्थान – गुडघा, हाड.
अकरावे स्थान – बोटे, श्वासोच्छवास, डावा कान, हात.
बारावे स्थान – पाय, तळवा, डावा डोळा.

दुसऱ्या व बाराव्या स्थानातील पापग्रह, नेत्रविकार, तिसऱ्या स्थानातील रवी – शनी वाढलेले टॉन्सिलस, चतुर्थ ग्रहातील पापग्रह हे छातीचे विकार (हार्ट अॅटॅक) व फुप्फुसाचे विकार दर्शवितात. पंचमातील केतू एखादे पोटाचे ऑपरेशन नक्की करवितो, असे प्रत्येक स्थानावरून सांगता येईल. सविस्तर लिहू गेले तर पुस्तकच लिहावे लागेल.

एवढे मात्र नक्की की वैद्यकीय सर्व रोग या बारा स्थानात सामावलेले आहेत व त्याचा योग्य तऱ्हेने अभ्यास होणे जरुरी आहे.

ASTROLOGY IS A SCIENCE OF TENDANCIES म्हणजे ज्योतिष शास्त्र हे एक असे शास्त्र आहे की तुम्ही कुठल्या पथावर चालला की, निसर्ग तुम्हाला साथ देईल, ते समजावून देते –

तेव्हा आपल्याला होणारे रोग जर का आधीच ओळखता येऊन ते न होण्याची खबरदारी घेतली तर रोगापासून बचाव करता येतो व त्याची तीव्रता कमी प्रमाणात होऊ शकते.

उदा. – मधुमेह होण्याची लक्षणे दिसल्यास साखरेचे प्रमाण कमी करता येते. रक्तातील साखर २४० ऐवजी १८० वर राहील.

PREVENTION IS BETTER THAN CURE – शेवटी असं सांगता येईल की THE DESTINY CANNOT BE CHANGED BUT IT CAN BE CHECKED –


भोग हा टाळू शकत नाही; पण त्याची तीव्रता कमी करता येणे शक्य आहे.

सूर्योदयापूर्वीच सूर्योदय झाला

लेखक : सारंग परनकर
अप्पर वर्धा वसाहत, वर्धा

महाराष्ट्र म्हणजे संतांची भूमीच. अशा प्रवित्र भूमीवर विदर्भाच्या अमरावती जिल्ह्यात यावली या गावी मंजुळा आईच्या पोटी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म झाला. त्यांचे गुरू भगवान श्रीमत् परमहंस श्री. आडकोजी महाराज. महाराजांच्या वडिलांचे नाव बंडोबा होते. बंडोबा नावाप्रमाणेच बंडखोर वृत्तीचे होते आणि मंजुळा आईचा स्वभाव नावाप्रमाणेच मंजुळ होता. एके दिवशी मंजुळामाता श्रीमत् आडकोजी महाराजांच्या दर्शनास गेल्या असता महाराजांनी त्या महान मातेस आंबा खाण्यास दिला. तो प्रसाद एकट्या मंजुळाआई करिता नसून सर्व जगाकरताच ठरला' यावले हे लहानसे खेडेगाव, बंडोबाची घरची परिस्थिती नाजूक, शिंप्याचा व्यवसाय करून त्यांचा चरितार्थ चालत असे. अशा गरीब आणि आदर्श घराण्यात १९०९ साली ३० एप्रिलच्या पहाटेस राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म झाला. अशा वेळी एक आश्चर्यकारक घटना घडली. जोराचा वारा आला आणि घरावरचे छप्परच घेऊन गेला. बाळ आणि आई उघड्यावर पडले, चटकनच सूर्यदेव आपली सहस्त्र किरणे घेऊन आत आला. वारा ही आत घुसला. जणू तो सांगत होता, 'आई मी जसा घर-घर करीत फिरतो तसा तुझा बाळ घर-घर करीत फिरेल. हा एका घरात गृहस्थीचा संसार करण्यासाठी नाही तर विश्व त्याचा संसार होईल. ' सूर्यच जणू बोलू लागला, " हे महान माते, मी जसा प्रकाश देतो व अंधार नाहीसा करतो तसा तुझा सुपुत्र जगाला ज्ञानाचा प्रकाश देईल व अज्ञानाचा अंधकार नाहीसा करील ; आणि खरोखरच तसेच घडले.

। राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जन्म लग्न कुंडली ।



ग्रहांचे अंश –

रवि १७ अं., चंद्र २२ अं., मंगळ २० अं.,
बुध २८ अं., गुरू ११ अं., शुक्र १८ अं.,
शनी २३ अं., हर्षल २८ अं., नेपच्यून २२ अं.,
राहू २६ अं.,

– महाराजांच्या कुंडलीतील महत्वाचे दृष्टीयोग –

गुरू चंद्र – गजकेशरी
गुरू हर्षल – नवपंचम्
गुरू रवी – नवपंचम्

गज - केशरी योगाबद्दल सर्व सुजाण वाचकांना कल्पना आहेच. तो त्रिकोणात आहे. गजकेशरी योगामुळे महाराज उपदेशात्मक लेखन करू शकले. महाराजांचा " ग्रामगीता " ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. लोकमान्य टिळकांच्या कुंडलीत गजकेशरी योग आहे. त्यांनी आपल्या वृत्तपत्राला " केसरी " हे नाव दिले. महाराजांची भजने महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत. रवी लग्नामध्ये उच्च राशीत आहे. रवी म्हणजे आत्मा. सर्व गृहात स्थान असलेला रवी तो लग्नामध्ये उच्च राशीत व गुरूच्या दृष्टीत आहे. त्यामुळे सुदृढ उत्तम प्रकृती, हजारो लोकांमध्ये भाषणे, कीर्तन करण्याची हिम्मत. बोलण्याकरिता बुध ग्रहाची कृपा असणे आवश्यक आहे आणि बुध सुध्दा लग्नीच आहे. त्यामुळे महाराज सुंदर - सुंदर बोलून लोकांची मने जिंकू शकले. महाराज कितीतरी भाषा बोलू शकत होते.

हे सुध्दा बुधाचेच कारण आहे. महाराजांच्या कुंडलीत बुध आणि शुक्र हे दोन्ही ग्रह लग्नी आहे. बुध शुक्र लग्नी असता गायन-शैली सहज साध्य होते. महाराजांनी गायलेल्या त्यांच्या भजनांच्या रेकॉर्डस खूप प्रसिद्ध आहे. त्यांच्या कुंडलीत मंगळ दशम स्थानात आहे. जनजागृतीसाठी ते क्रांतीकारी झाले. आपल्या भजनात " पत्थर के बाँम्ब बनेंगे " अशा प्रकारची क्रांतीकारी शब्द वापरून जन - जागृती केली.

महाराजांच्या कुंडलीत राहू धन स्थानात आहे. धनेश शुक्र मंगळाच्या दृष्टीत आहे. धनस्थानावर शनीची दृष्टी आहे. त्यामुळे जन्मताच दारिद्रय व पुढे ही धनसंचय करू शकले नाही. मंगळाची सुख स्थानावर दृष्टी, चैन नाही व आराम सुध्दा नाही. लग्नेशाची गुरूवर दृष्टी भाग्येश गुरूची भाग्य स्थानावर दृष्टी पंचमेश गुरूच्या दृष्टीत गुरूची लग्नावर दृष्टी या सर्व गोष्टीमुळे खूप देशभर फिरण्याचा योग, तसेच परदेशात जपान सारख्या देशात फिरण्याचा योग आला. पराशर यांच्या मताप्रमाणे येथे राजयोग सुध्दा झाला आहे. (लग्नेश पंचमेश भाग्येश म्हणजे केंद्र कोनाचा लक्ष्मी नारायणाचा संबंध) जरी त्यांनी राज्यपद उपभोगले नाही तरीपण खूप नाव-लौकिकता आणि आदरनियता मिळविली. ते आजन्म ब्रम्हचारी राहिले. याबद्दल सप्तमेश, धनेश शुक्र मंगळाच्या दृष्टीत आहे. एवढेच माझ्या अज्ञान मनाला वाटते. बाकी वाचकांनी विचार करावा. त्यांच्यावर विषबाधेचा प्रयोग झाला होता. त्याला कारणीभूत धनस्थानातील राहू आहे. २८ ऑगस्ट १९४२ साली महाराजांना अटक झाली. त्यांच्या अष्टम स्थानात शनी आहे आणि व्ययेश अष्टमेशाच्या दृष्टीत आहे. त्यामुळे त्यांना ४ महिने तुरुंगवास भोगावा लागला.

महाराजांचा मृत्यू कॅन्सरच्या आजारामुळे झाला. प्र. सु. आंबेकर यांनी जुलै ८७ ग्रहांकितमध्ये कुंडलीवरून रोगनिधान या लेखात कॅन्सरच्या आजाराला जी कारणीभूत ग्रहस्थिती असते. ती गृहस्थिती महाराजांच्या कुंडलीला जुळती मिळती आहे. कृपया वाचकांनी तो लेख वाचून विचार करावा ही विनंती.

।। इति शुभं भवतु ।।

- लेखकांसाठी सूचना -

- ग्रहांकितसाठी लेख पाठविताना कृपया फुलस्केप कागदावरच एका बाजूला लिहिलेले असावे. मोबदल्याची अपेक्षा असेल तर तसा स्पष्ट उल्लेख करावा.
- लेख ज्योतिष व तद्नुषंगिक विषयावरच असावा. कथा कवितांचाही विचार केला जाईल, परंतु त्या ज्योतिष शास्त्राच्या संदर्भात असाव्यात.
- लेखांतील उदाहरणादाखल दिलेल्या पत्रिकांची जन्म तारीख, जन्म वेळ, व जन्म स्थळ यांचा उल्लेख शक्यतो करावा.
- लेख प्रकाशित होण्याचा निश्चित महिना कळविणे शक्य नसते. नापसंत साहित्य परत पाठविले जाणार नाही. कृपया पोस्टेज पाठवू नये.
- संपादकाचा निर्णय अखेरचा.

ग्रहदशा व मानव

लेखक – श्री. शरद जोशी
८६८ सदाशिव पेठ, पुणे ३०. (ट्रेनिंग कॉलेज पिछाडी)

ज्योतिष हा संशोधनाचा विषय आहे. मानवाचे जीवन जर सुधारावयाचे असेल तर ज्योतिष व भविष्य सांगणाऱ्यांनी प्रथम ग्रहांची उपासना करावी तरच त्यांच्या भविष्य वाणीत सत्यता आढळेल. मानवी जीवनात भविष्य काळात येणाऱ्या संकटाची कल्पना ज्योतिषामुळेच सिध्द होते. कोणाच्याही कुंडलीत त्याच्या नशिबात असणारे विविध प्रकारचे लाभ व उपभोग कधीच चुकत नाही. मात्र अशी व्यक्ती तितका काळ संयम ठेवून राहिली तरच तो सुखाचा उपभोग घेऊ शकतो. कुटुंबातील मंत्री मंडळातील सामाजिक जीवनातील विविध स्तरावरील एकाची कुंडली पाहून ज्योतिष वर्तविणे चूक आहे.

ग्रह हे सत्ताधीशच आहेत.

नऊ जातीचे ग्रह व त्यांची उत्पत्ती आपण मानव होत. मंत्र म्हणजे देवता. देवता म्हणजे मंत्र नाहीत. मूर्तिपूजन केवळ त्या त्या कुटुंबात वा समाजात तितका काळ संयम ठेवण्याचे एक साधन आहे. कोणी श्री शंकर गणपती, देवी, दत्त यांना पाहिले आहेत का ? पण विविध मंत्राने विशिष्ट देवतांचे दर्शन होते, हे मी स्वतः अनुभवले आहे. ज्योतिषशास्त्राच मंत्रांवर अवलंबून आहे. ज्याची त्याने उपासना करावयाची आहे. व ती सुध्दा अंधश्रध्दा न ठेवता. या शास्त्राच्या आधारे बारेमाप पैसे काढण्याचे जे ज्योतिषी साधन करतात व त्याचमुळे समाजाचा देवावरचा किंवा ज्योतिषावरचा विश्वास उडाला आहे.

मंत्र वा परमेश्वरी चिंतनास जातपात नाहीच.

मंत्र वा उपासना केवळ ब्राह्मणांची मक्तेदारी नाही. ब्राह्मण शुध्दवाणीने उपासना करतात हे ही चूक आहे. मात्र ही विद्या म्हणजे ब्राह्मणांनाच वरदान आहे असे मानणे हे मूर्खपणाचे असून अहंकारी मनाचे द्योतक आहे. श्रीराम क्षत्रिय तर श्रीकृष्ण यादव कुळातील. श्री हनुमान वानर योनीतील पण त्या अद्‌भुत शक्ती होत्या. त्यांच्याकडे दुष्टांचा बिमोड करण्याची जप साधना होती. त्यांचा त्यांच्यावर विश्वास होता. म्हणून ती दैवते झाली. राक्षस वृत्तीची माणसे म्हणजे राक्षस नाही. सर्व साधारणपणे राक्षसाचे विकृत चित्रच समाजात बिंबवले जाते. श्रीरामायण, महाभारत ह्या ग्रंथाचे लिखाण महान तपस्वी यांनी केले ते मंत्र सामर्थ्यावरच. मानवात सर्वात उत्तम श्रेष्ठ वर्ण असेल तर तो मागासवर्गीयच; पण आपण या समाजास कमी लेखतो. ते राहू व केतूचे अवतार आहेत.

जन्मकुंडली वरून रोग निदान होतेच.

कोड, कॅन्सर, अल्सर, रक्तदोष, महारोग, निद्रानाश, मधुमेह, मूतखडा, पोलिओ, दमा, क्षय किंवा कोणतेही शारीरिक रोग ग्रहदशेमुळेच होतात. किंबहुना कुटुंबातील अन्य व्यक्तींच्या ग्रहदशेचेही परिणाम होत असतात. यासाठी विविध प्रकारचे नवग्रह मंत्र; देवतांचे मंत्र आहेत. ज्याचे त्यांनीच करावयाचे आहेत. मजकडे आजपर्यंत हजारो अशा प्रकारचे शारीरिक भोग असलेल्या व्यक्ती आल्या व बऱ्या झाल्यात. अर्थातच तसा वेळ त्या माणसांनी दिला व स्वतः अनुभव घेतला. दिवसांकाठी फक्त १० ते १५ मिनिटांची उपासनाच श्रेष्ठ होते. डॉक्टरी इलाज करण्यापूर्वी प्रत्येकाने जर आपणच आपली भरभराट करून घेतली तर अंधश्रध्दा राहणारच नाही.

उपासना करण्यास जातपात नाही.

ब्राह्मणास कोणतेही कर्म करण्याचा अधिकार केवळ त्याच्या शुध्दवाणीने मिळाला आहे. अन्य समाजातील माणसांनीही अलीकडच्या काळात त्यांना मिळालेल्या सामाजिक सोयींमुळे ती माणसेही विविध क्षेत्रात चमकू लागली. व त्याचबरोबर आमचा तिळपापड होऊ लागला. प्रत्येकाने दुसऱ्याचे हित जपणे यासारखी श्रेष्ठ उपासना नाही. संतती न होणे, न जगणे, अर्धवट किंवा वेडेपणाची भावना असणे, हे सर्व शापित कुंडल्यात पाहण्यात मिळते. कितीही महान तपस्वी असला तरी त्यास स्त्रीची साथ लागतेच त्याशिवाय ते ते मंत्र सत्कारणी लागत नाहीत. स्त्री ही सर्व मंत्राची मूळ शक्ती आहे. व तो अेक मंत्राचा आदर्श आहे; पण याचाही दुरुपयोग करणारे महाभाग चांगल्या घराण्यातीलच आहेत. नुसते किर्तनकार, प्रवचनकार झाले म्हणजे ती व्यक्ती विद्वान नाही. सगळेच किर्तनकार व्यभिचारी नसतात. आणि हे सुद्धा सर्व ग्रहदशेचेच संकल्प आहेत.

संतती होण्यासाठी व जगण्यासाठी उत्तम उपाय

कुंडलीत पंचमस्थान व सप्तमस्थानास महत्त्व असते. विवाह होण्यासाठी गुण जमत नसले तरी या दोन स्थानाचा विचार करून त्या स्थानावर अन्य कोणत्याही ग्रहाची वक्र दृष्टी नसेल तर संतती होतेच. मात्र ती स्थाने दूषित असतील तर मागासवर्गीयांनाच दैवत मानले तर संतती जगतेच. याचा मी सखोल व त्या दृष्टीने असंख्यांना अनुभव आला आहे.

सध्याचा काळ दहशत वादाचा आणखी चार महिनेच

वृश्चिक राशीत तीस वर्षापूर्वी शनिग्रह असताना १९५५ ते ५७ या काळातही असाच अतिरेकीपणा होता. व दर तीस वर्षांनी असाच अनुभव येणार. सर्वच जगात अस्वस्थपणा व आतंकवादी प्रयोग होणारच. ते चुकणारच नाही व याचसाठी दर मंगळवारी श्री मारुतीस पाच चमचे तेल व अकरा काळे उडीद वाहिल्यानें कमी प्रमाणात त्रास होईल.

चि. राजीव गांधी नंतर कु. प्रियांकाच सत्ताधीश होणार

चि. राजीव गांधी सध्या एका विशिष्ट काळातून संयमाने चालले आहेत. ते वृश्चिकेतील शनीची फळेच भोगत आहेत. त्यांची कन्या कु. प्रियांका वयाच्या २९ व्या वर्षी राजकारणात चमकेल वयाच्या ३३ ते ३६ या काळात ती सर्वात तरुण व महिला पंतप्रधान म्हणून चमकेल. हे त्यांना मी कळविले आहेच.

अन्य धर्मांना धर्म ग्रंथ आहेत हिंदूंना कोणता धर्मग्रंथ

पारशी, मुसलमान युरोपातील सर्वांना धर्मग्रंथ आहेत. आपण गीता हा धर्म ग्रंथ मानतो. गीता हा धर्मग्रंथ होऊच शकत नाही. गीता हा भारतीयांचे मानसिक बल वाढविणारी शक्ती आहे. जशास तसे हे धोरण आहे. तर जे काही विविध मंत्र आहेत, संस्कृती आहे, तेच आपले धर्मग्रंथ होत.

मंत्राच्या पठणाने ज्याचे त्यांनी आयुष्य सुधारावे

मंत्रांच्या सहाय्याने विविध रोग बरे होतातच हा अनुभव शेकडो नव्हे तर हजारोंना आला आहे. ज्योतिषांनी भविष्य काळात येणाऱ्या संकटावर उपाय सुचविले तरच ते ज्योतिष विविध असे हजारो मंत्र आहेत. एकाक्षरा पासून एकादश अक्षरापर्यंत व एक लाखापासून अकरा लाखापर्यंत संख्या आहेत. तरच ते सार्थकी होतात व त्यास सिध्दी म्हणतात.

याबाबत प्रत्येकाने संशोधन वृत्ती व समाजाच्या हिताचा विचार केला तरच मंत्र सामर्थ्य वाढते. संकट काळात स्थिरता येते. पण हे ज्याचे त्यांनी करावयाचे आहे. ग्रहांकितास शुभकामना देऊन उपासकांना पुढील अंकापासून मंत्राचे सहकार्य घ्यावे अशी लेखमाला लिहिन. तूर्त श्रद्धा व संयम ठेवणे हिताचे.

ज्योतिषशास्त्र व रत्नचिकित्सा

लेखक : मधुकर हरी गांधी
सी-३४, अमोल सोसायटी, गवाण पाडा, मुलुंड (पूर्व) मुंबई ४०० ०८१.

एखाद्याची तब्येत बिघडली किंवा कोणतेही आजारपण आले म्हणजे वैद्यकीय सल्ला घेऊन योग्य ती औषधी उपाययोजना करावी लागते. त्याचप्रमाणे मानवाच्या आयुष्यातही अनेक प्रकारचे चढ उतार नेहमीच संभवतात. अगदी जन्मदिवसापासून मृत्यूपर्यंत अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे शारीरिक वाढ, आजारपण शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायामध्ये समाधानकारक स्थिती, विवाह विवाहसौख्य, संततीसौख्य, संततीची प्रगती, मध्यम वयातील प्रश्न, आर्थिक प्रगती व स्थैर्य, उतारवयांतील आजार, मनातील इच्छा व आकांक्षा पुऱ्या होणे इत्यादींसाठी आयुष्यभर धडपड चालू असते, अशा परिस्थितीत बऱ्याच व्यक्तींना आपल्या भविष्यात कायआहे. हे जाणून घेण्याची इच्छा असते. तर काही व्यक्तींच्या बाबतीत आयुष्य उद्ध्वस्त करणारे प्रश्न निर्माण होतात अशावेळी त्या व्यक्ती, अड-चणींचे निराकरण होण्यासाठी ज्योतिषांचा सल्ला घेऊन कोणते उपाय करावेत वगैरे प्रश्न विचारतात.

ज्योतिष शास्त्रामध्ये जन्मलग्न कुंडली म्हणजे जन्मवेळेचे ग्रह, प्रश्नकुंडली म्हणजे प्रश्नवेळेचे ग्रह, हस्तसामुद्रिक,इत्यादीवरून भविष्य सांगण्याची प्रथा आहे, हे बहुतेक सर्वांना माहित आहे. त्याचप्रमाणे चेहऱ्यावरून (Face Reading), हस्ताक्षरावरून, रमलशास्त्रावरून इत्यादी अनेक उपप्रकार आहेत. या सर्वांमध्ये ग्रहनक्षत्रावरून भविष्य पाहण्याने जातकाच्या आयुष्यामधले अनेक वारकावे समजू शकतात. या लेखामध्ये मी वैश्विक किरणांच्या (Cosmic Rays) सहाय्याने जातकाच्या इच्छा व आकांक्षा कशा फलद्रूप करता येतील या दृष्टीने जे संशोधन व प्रयोग केले आणि करीत आहे त्या विषयी लिहीले आहे. या माझ्या प्रयोगामध्ये मला चांगले यश मिळाले असे मला जातकाच्या अभिप्रायावरून वाटते व म्हणून माझे व्यवसाय बंधू व वाचक यांच्या विचारांना चालना देण्याच्या दृष्टीने माझे अनुभव मांडले आहेत.

जातकांची अपेक्षा असते की आपल्या इच्छा व आकांक्षा पूर्ण व्हाव्यात व त्या दृष्टीने, ग्रहांची शांती, ठराविक वारी उपवास किंवा कोणत्या दैवताची आराधना करावी वगैरे संबंधी जातका-कडून विचारणा होत असतात; परंतु मला वाटते की वरील उपाय हे मानसिक शांती देणारे असतील, पण हे उपाय शास्त्रोक्त नाहीत (Unscientific). या संदर्भात मी कित्येक जातकांच्या कुंडल्या पाहून व काही जातकांच्या नवीन कुंडल्या तयार करून त्यांना आवश्यक असलेल्याग्रहांची रत्ने, विशेषत: वक्री स्तंभी व ६, ८, १२ या भावामध्ये स्थित असलेल्या किंवा त्या भावाच्या स्वामींच्या ग्रहांची वापरण्याचा सल्ला दिल्यानंतर दोन ते तीन महिन्यात त्यांचे आश्चर्य-कारक परिणाम अनुभवास आले व त्यांना अपेक्षित फले मिळावयास लागली. ग्रहांपासून निघणारे वैश्विक किरण (Cosmic Rays) हे आपल्या कुंडलीतील ग्रहानुसार संबंधित स्थानाची फले देत असतात, पण जर तेच ग्रह वक्री, स्तंभी किंवा ६, ८, १२ या स्थानाशी संबंधित असतील तर त्यांचे वैश्विक किरण आपल्यापर्यंत पोहोचत नाहीत व अशा वेळी त्या ग्रहांची योग्य तेवढीच रत्ने वापरली तर ते वैश्विक किरण रत्नांतून मिळतात व अपेक्षित फले उत्तम प्रकारे मिळतात. गेली १४–१५ वर्षे मी ज्यांच्या जन्मपत्रिका पाहिल्या व नवग्रहांच्या रत्नांपैकी योग्य ती रत्ने वापरण्याचा सल्ला दिला त्यांना साधारणपणे दोन ते तीन महिन्यात अपेक्षित फळे मिळाली, तर काही व्यक्तींना पाच ते सहा महिने लागले. या अनुभवावरून माझी खात्री झाली की अपेक्षित फले मिळविण्यासाठी वक्री, स्तंभी व ६, ८, १२ या स्थानातील ग्रह किंवा ज्या ग्रहांचे वैश्विक किरण मिळविण्याची आवश्यकता आहे अशा ग्रहांची रत्ने वापरली तर सुयोग्य परिणाम दिसून येतात.

आपल्या परंपरागत शास्त्रानुसार जेव्हा राहू व केतू यांच्या एका बाजूला सर्व ग्रह असतात त्या योगाला कालसर्पयोग म्हणतात. आपल्या पूर्वाचार्यांनी या योगाला कालसर्पयोग हे नामाभिधान दिले असले तरी शास्त्रीय भाषेत अशी कुंडली असमतोल होते व अशा वेळी राहू (Positive Pole) व केतू (Negative Pole) यांच्या ज्या बाजूला कुठलेच ग्रह नाहीत किंवा असलेच तर ते स्तंभी किंवा वक्री असतील तर राहू व केतू यांना जोडणारी अज्ञात भिंत मध्ये

उभी राहून ज्या बाजूला ग्रह नाहीत त्या भावांची फले मिळत नाहीत अशावेळी इतर रत्नांसमवेत राहूचे रत्न " गोमेद " किंवा केतूचे रत्न " लसण्या " यापैकी जे आवश्यक असेल ते वापरले तर कालसर्प योगाचा दोष निघून जाऊन कुंडली समतोल (Balanced) होते व सुयोग परिणाम मिळतात. रवि व चंद्र हे ग्रह कधीच वक्री नसतात पण हेच जर कारक ग्रह असून ते ६, ८ व १२ या स्थानी असतील तर रविचे रत्न " माणिक " किंवा चंद्राचे रत्न " मोती " वापरले तर शुभ परिणाम मिळतात.

उदाहरण सांगावयाचे म्हणजे जर पती किंवा पत्नी या दोघांपैकी किंवा एकाच्या जन्मकुंडलीमध्ये जर पंचमभावाचा स्वामी वक्री येतात. त्याच किंवा वक्री ग्रहांच्या नक्षत्रात असेल तर संतती योगामध्ये अडथळे प्रमाणे पंचमभावाधिपती षठांत असेल तर संतती रोगी, अष्टम भावात असेल तर अल्पायुषी व द्वादशात असेल तर अकाली गर्भपात वगैरे संभवतात. यावर उपाय म्हणजे जर संबंधित वक्री, स्तंभी किंवा ६, ८, १२ या भावाशी संबंधित ग्रहांशी रत्ने पती किंवा पत्नी किंवा जरूरीप्रमाणे दोघांनाही वापरली तर शुभ परिणाम अनुभवास आले आहेत. आतापर्यंत मी अशा २२ दांपत्यांना रत्नाचे उपाय सांगितले व त्यातील पंधरा दांपत्यांना संतती प्राप्ती झाली. यातील काही दांपत्यांना विवाह होऊन ८–१० वर्षे झाली होती· संततीच्या संबंधी बऱ्याच वेळा वैद्यकीय तपासणीत काही दोष आढळत नाही तरीसुद्धा ८–१० वर्षे विवाह होऊन संतती होत नाही. यासाठी इतर रत्नांबरोबर मोती (अच्छिद्र) पाण्यात ठेवून ते पाणी सूर्यकिरणांमध्ये सुमारे एक तास ठेवून ते पाणी सतत काही महिने प्याल्यास, स्त्रीयांच्या बाबतीत अनियमित मासिक पाळी नियमित होते व शरीरातील विषारी द्रव्ये लवकी वाटे बाहेर फेकली जाऊन शरीर गर्भधारणेच्या दृष्टीने कार्यक्षम होते व शरीर कांतिमान होते चेहऱ्यावर तेज येऊन शरीरात उत्साह येतो. हे पाणी पती पत्नी दोघांनीही प्यावे. गर्भधारणेच्या दृष्टीने हे उपाय करतान महादशा, अंतर्दशा व गोचरीच्या ग्रहांचाही विचार करावयास हवा.

विवाहासंबंधी उपवर व वधू यांचे विवाह जमण्यामध्ये बरेच अडथळे येतात. तर काही वेळा जमलेली लग्ने साखरपुडा होऊन मोडतात तर काही वेळा विवाहानंतर घटस्फोट किंवा दुरावा निर्माण होतो. ज्यांच्या कुंडलीत सप्तम भावाचा स्वामी वक्री, किंवा वक्री ग्रहांच्या नक्षत्रात असेल तर विवाह जमण्यामध्ये किंवा विवाह झाल्यावर अनेक प्रश्न निर्माण होतात. अशा प्रकारच्या कुंडल्या नीट तपासून जर त्या वक्री, स्तंभी इत्यादी ग्रहांची रत्ने वापरली तर त्यांचे विवाह २-३ महिन्यात होतात. बेबनाव व घटस्फोटाच्या प्रकारामध्ये रत्ने वापरल्यानंतर योग्य त्या महादशा, अंतर्दशा व गोचरीच्या ग्रहांचा परिणाम मिळून कालांतराने समझोता झाल्याचे माझ्या चांगल्या अनुभवात आहे.

आरोग्याच्या बाबतीत जेव्हा लग्न षष्ठ व अष्टम भावाचे कारक ग्रह स्तंभी, वक्री किंवा ६, ८, १२ या स्थानी स्थित असतात व विशेषत: त्या ग्रहांच्या महादशा व अंतर्दशा येतात, त्यावेळी त्या संबंधित आजारांचे ग्रहांच्या कारकत्वानुसार दुखणे किंवा आजारपण सुरू होते. काही वेळा अशा आजारांचे स्वरूप गोच रीच्या ग्रहामुळे गंभीर बनू शकते. कित्येक वेळा काही आजारांचे निदान करणे वैद्यकीय शास्त्राच्या कक्षेपलीकडचे (Beyond diagnosis) असते. त्यावर संबंधित ग्रहांची रत्ने वापरून उत्तम गुण आल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. ही वैश्विक किरणे काही प्रकारच्या आजारात रंगीत बाटलीत (हिरवा, पिवळा, लाल निळा,) इत्यादी पाणी भरून ती बाटली सुमारे १ ते २ तास सूर्यकिरणात ठेवून ते पाणी पिल्याने मिळतात. तसेच साध्या (रंगीत नव्हे) काचेच्या बाटलीत संबंधित ग्रहांची रत्ने ठेवून व सूर्यकिरणात ठेवून अशा बाटलीतील पाणी आजाऱ्याने प्याले म्हणजे अपेक्षित परिणाम मिळून तब्येत सुधारते व रोग्याचे मूळ नष्ट होते. अशा पाण्याचा उपयोग चमडीचे रोग, अग्निमांद्य, निद्रानाश, सांधेदुखी व मानसिक अवस्थता यावर चांगला होतो.

अगदी अलीकडचे उदाहरण सांगावयाचे म्हणजे माझ्याकडे श्री. क्षीरसागर हे तरुण गृहस्थ त्यांच्या मित्राच्या सल्ल्यावरून आले. त्यांची व्याधी म्हणजे त्यांचा स्वर बोलण्याचा आवाज बसका व बायकी (Ladies voice) होता. त्यामुळे मित्रमंडळी किंवा चारचौघात त्यांना काहीही बोलण्याची लाज वाटत असे. त्यांनी अनेक वैद्यकीय उपचार केले पण काहीच उपयोग झाला नाही. वैद्यक तज्ज्ञांनी शवटी त्याना सांगितले की हा जन्मजात दोष आहे. व त्याला उपाय नाही, मी त्यांची जन्मकुंडली (स्पष्ट ग्रह, नवमांश व महादशा) तयार केल्यावर माझ्या लक्षात कांही ग्रहांच्या अवस्था झाल्या. त्यांच्या कुंडलीत एकही ग्रह वक्री नाही, पण कालसर्प (Imbalance) योगाची कुंडली दिसून आली. त्याचप्रमाणे सदर कुंडलीत वाचेचा कारक ग्रह बुध हा गुरूच्या युतित लग्नी वृश्चिक राशीत आहे. व वाणीचे (Voice) चे स्थान म्हणजे द्वितीय स्थानी गुरुची धनु रास असून तेथे शनी आहे व गुरूची जो दुसरी राशी मीन ही पंचमांत असून तेथे केतू आहे, याशिवाय लग्नेश मंगळ व्ययस्थानी म्हणजे व्दादशात तूळ राशीत रवीच्या युतीत व नेपच्यून बरोबर आहे शिवाय त्यांची २२–७–१९७० पासून शनी महादशा सुरू झालेली आहे व ती २२–७–१९८९ पर्यंत आहे. ग्रहांच्या व भावांच्या या अवस्था लक्षात आल्यावर त्यांना मी माझ्या पद्धतीप्रमाणे माणिक व लसण्या (रवी व केतू; यांची रत्ने) एकाच अंगठीत बसवून रवीच्या बोटात म्हणजे अनामिकेत वापरण्यास तयार करून दिली. त्याचप्रमाणे बुधाचे वैश्विक किरण मिळण्यासाठी सूर्यकिरणात ठेवलेले हिरव्या रंगाच्या बाटलीतील पाणी रोज पिण्यास सांगितले. त्यानंतर ते गृहस्थ सुमारे दीड महिन्यानंतर मला भेटावयास आले व तेव्हा त्यांचा पूर्वायुष्यातला बसका व बायकी आवाज इतिहास जमा होऊन, आश्चर्यकारकरित्या मर्दानी आवाजात ते बोलू लागले. मला स्वतःलासुद्धा त्यांच्या आवाजात एवढा फरक पडेल याची सुरुवातीला खात्री

नव्हती. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अगदी ओसंडून जात होता. त्याचे हितचिंतक व मित्र त्यांना कुठल्या डॉक्टरांची उपाय योजना केलीस असे विचारू लागले. माझे व्यवसाय बंधू व विचारवंतासाठी त्याची जन्मकुंडली व स्पष्ट ग्रह इत्यादी खाली देत आहे.


नाव :– श्री. क्षीरसागर.

जन्मदिनांक :– मंगळवार १०–११–१९५९.

जन्मवेळ :– सकाळी ८–१२ (A M)


जन्मस्थळ :– मुंबई.

जन्मलग्न कुंडली



लग्न ७ १४° ३२'

नवमांश कुंडली



वक्री ग्रह :– एकही नाही.

स्पष्ट ग्रह :–

र	चं	मं	बु	गु	शु	श	रा	के	ह	ने
६	१०	६	७	७	५	८	५	११	३	६
२३अं	२४अं	२०अं	१५अं	१३अं	७अं	१०अं	८अं	८अं	२७अं	१३ अं
४७'	२५'	१८'	४५'	५८'	१८'	३६'	१७'	१७'	४५'	५४'

अलीकडे परदेश गमनाच्या योगाबद्दल, विशेषत: तरुण पिढीला फार उत्सुकता असते व परदेशी जाण्याची इच्छा पूर्ण होईल का अशा प्रकारचे प्रश्न विचारले जातात. जर तृतीय, नवम व द्वादश स्थानांशी संबंधित असलेले ग्रह वक्री किंवा वक्री ग्रहांच्या नक्षत्रात नसतील तर योग्य महादशा व अंतर्दशा चालू असतील किंवा येतील तेव्हा परदेशगमनाचा योग येईल; पण जर संबंधित ग्रह वक्री किंवा वक्री ग्रहांच्या नक्षत्रांत असतील तर परदेशगमन घडत नाही. अशा वेळी संबंधित वक्री ग्रहांची रत्ने वापरून योग्य ते वैश्विक किरण मिळविले तर परदेशगमगाची इच्छा फलद्रूप होते.

वरील रत्नोपचारांबरोबर संबंधित ग्रहांच्या मंत्रांचा जप- नवग्रह स्तोत्रांतील केल्यास, त्रोच्चारांतील स्वरांच्या कंपनामुळे (Vibrations) सुयोग्य परिणाम मिळतात, परंतु सर्व नवग्रह स्त्रोत्र म्हणू नये किंबहुना म्हणण्याची जरुरी नाही. म्हणजे जर जन्मलग्न कुंडलीत गुरू व मंगळ हे वक्री किंवा स्तंभी असतील तर फक्त गुरु व मंगळ त्याबरोबर ६, ८, १२ या स्थानांतील फक्त आवश्यक त्याच ग्रहांच्या मंत्राचा जप केल्यास लवकर अपेक्षापूर्ती होते. हा उपाय मला सुचण्याचें कारण म्हणजे कित्येक वर्षापूर्वी मी उत्सुकता म्हणून "सूर्य संहिता" या नाडी ग्रंथात माझे स्वत:चे भविष्य पहाण्यासाठी गेलो असता माझ्या पत्रिकेप्रमाणे नाडी ग्रंथ पहाणाऱ्या गृहस्थानी नाडीग्रंथात लिहिल्याप्रमाणे रवी व शुक्र या दोन मंत्रांचा जप करण्यास संगितले होते मी त्याप्रमाणे केल्यावर मला त्याचे उत्तम परिणाम अनुभवास आले; पण त्या वेळी फक्त दोनच ग्रहांच्या मंत्राचा जप का करण्यास नाडीग्रंथात लिहीले होते याचा खुलासा झाला नाही. नंतर पुढे ज्योतिष शास्त्र शिकल्यानंतर व त्या मध्ये संशोधन केल्यावर माझ्या जन्मकुंडलीत रवी व शुक्र हे दोन ग्रह १२ व्या स्थानांत असल्यामुळे या मंत्राचा उपयोग झाल्याचे माझ्या निदर्शनास आले. माझ्याकडे सल्ल्यासाठी येणाऱ्या जातकांना मी ग्रहरत्नांबरोबर ठराविक ग्रहांच्या मंत्राचा जप करण्यास आवर्जून सांगतो व त्याचा उत्तम परिणाम त्यांना जाणवतो. ग्रहांच्या मंत्राचा जप हा शास्त्रोक्त उपाय आहे असे मी म्हणणार नाही; पण ग्रहांच्या मंत्रातील स्वरांच्या कंपनामुळे (Vibrations) आपल्या जवळपास असलेल्या वाईट अदृश्य शक्ती (Evil spirits) आपल्यापासून दूर जाऊन जवळचे वातावरण शुद्ध होत असावे अशी माझी धारणा आहे.

मंगळ समज-असमज

लेखक – डॉ. सुरेश र. देशपांडे, एम. ए. पी. एच. डी.
मराठी विश्वकोश वाई (सातारा) ४१२८०३.

विद्यमान वैज्ञानिक युगात ज्योतिषशास्त्राचे महत्त्व सांप्रतच्या धकाधकीच्या जीवनामुळे उत्तरोत्तर वाढत आहे. सामान्यतः नागरी जीवनामध्ये रोजच्या घटनांचा भरंवसा राहिलेला नाही. त्यामुळे या फलज्योतिषशास्त्राकडून काही मार्गदर्शन लाभल्यास फारच छान, या तारतम्य बुद्धीने अनेक जण आपले भवितव्य अजमावून घेताना दिसतात; तथापि शास्त्रशुद्ध विवेचनात काही अडचणी उद्भवतात. विशेषतः जन्म कुंडली मांडताना जन्म वेळ आणि तारीख यांच्या निश्चितपणा विषयी अनेकांना सांगता येत नाही. परिणामतः अचूक कुंडली मांडता येत नाही. परिणामतः ग्रहांची फलिते अस्पष्ट वर्तविली जातात.

बहुतेक ज्योतिर्विदांना सतत विचारला जाणारा प्रश्न आणि विषय म्हणजे विवाह योग ! तो कसा आहे, केव्हा आहे ? मुलगी वा मुलगा कसा मिळेल ? वधूवरांच्या जन्मपत्रिका जुळतात का ? मंगळ आहे का ? तो सौम्य वा उग्र आहे ? गुणमीलन किती ? असे अनेक प्रश्न नित्यनियमाने अनुभवास येतात. अगदी ग्रामीण भागातून आलेले लोकसुद्धा या गोष्टींचा आजकाल गांभीर्याने विचार करताना दिसतात. किंबहुना एखाद्या पंचांग पाहणाऱ्या ब्राह्मणाने वा ज्योतिर्विदाने काही दोष दर्शविल्यास जुळत आलेली लग्ने मोडलेली दिसतात. तेव्हा अशा जन्मपत्रिकांच्या संदर्भात मंगळाला किती महत्त्व द्यावयाचे आणि 'मंगळ' आहे' म्हणजे नेमके काय ? त्याचा दोष कुणाला असतो आणि किती ? त्यातून काय अनुभव वा आपत्ती येते, याची समग्र चर्चा प्रस्तुत लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.


विवाह विषयक उपवर मुलामुलींच्या जन्मपत्रिका पाहून फक्त मंगळ व गुणमीलन एवढाच विचार करून विवाह निश्चित करणे अप्रस्तुत ठरेल; कारण विवाह हा एक पवित्र धार्मिक संस्कार आहे आणि विवाहोत्तर जीवनात कामसुखाबरोबरच आर्थिक स्वास्थ्य, प्रतिष्ठा, संतती, इतरांशी संबंध / संघर्ष इत्यादि अनेक तपशीलांचा विचार व्हायला हवा. याकरिता मंगळाला वाजवी महत्त्व देऊन काळजीपूर्वक कुंडली पाहून ज्योतिषाने शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण वधूवरांना सौम्य शब्दात सांगून त्यातील अडचणी सोडविण्याचे उपाय सुचविले पाहिजेत. ज्योतिषशास्त्र हे जीवनातील घटनांचे पूर्णपणे परिवर्तन करणारे शास्त्र नसून ते एक मार्गदर्शन करणारे शास्त्र आहे हे पटवून दिले पाहिजे.

नाडी, कूट, गण, ग्रहमैत्री, योनी, ताराबळ, वश्य आणि वर्ण अशा आठ प्रकारांनी वधू-वरांच्या जन्मटिपणांचे अनुकूल-प्रतिकूलत्व पाहण्याचा प्रकार पूर्वीपासून प्रचलित आहे. गुणमीलनाच्या दृष्टीने वर्णाचा एक, वश्याचे दोन, ताराबलाचे तीन, योनीचे चार, ग्रहमैत्रीचे पाच, गणाचे सहा, कूटाचे सात व नाडीचे आठ असे एकूण छत्तीस गुण येतात. याप्रमाणे सर्व जन्मपत्रिका जमतातच असे नाही. ३६ गुणांइतके गुणमीलन होईल असेही खात्रीलायक दृष्ट्या सांगता येत नाही. किमान १८ गुणांपेक्षा जास्त गुण आले म्हणजे विवाहास हरकत नाही, असे बहुतेक प्राचीन शास्त्रकारांचे मत आहे. तो विवाह हितप्रद होतो; मात्र कमी गुण असता विवाह करू नये, त्यातसुद्धा विशेष असा की नाडी, गण, कूट व ग्रहमैत्री हे चार किंवा कमीत कमी तीन प्रकार जर उत्तमरीत्या जमत असतील, तर निश्चितपणे विवाह करावा. तो फलद्रूप होतो इतर चार प्रकार पाहण्याचे कारण नाही; मात्र एक नाडी केव्हाही असता कामा नये, ती सर्वस्वी वर्ज्य मानावी, असा एक प्रमुख विचार आहे.

मंगळाच्या जन्मपत्रिकेतील स्थानावरून त्याचे अशुभ स्थान ठरवितात. वधू आणि वर यापैकी एकाच्या कुंडलीत जी अशुभ म्हणून सांगितलेली स्थाने आहेत, त्या ठिकाणी मंगळ असल्यास आणि दुसऱ्याच्या कुंडलीत तो नसल्यास असा विवाह करू नये, असे काही ग्रंथात नमूद केले आहे. असा दोषास्पद मंगळ ज्या कुंडलीत असेल, त्यास मंगळ आहे किंवा या मुलीला मंगळ आहे, किंवा या वराला मंगळ आहे, असे म्हणण्याचा प्रघात आहे. तेव्हा हा मंगळ आहे, म्हणजे नेमके काय आहे ? याचा अर्थ काय ? व त्याचे फलित काय ? कारण प्रत्येक कुंडलीत कोणत्यातरी स्थानात मंगळ हा ग्रह असणार आणि ते स्वाभाविकही आहे. परंतु जे मंगळ आहे, असे म्हणतात, त्यांना हा दोषयुक्त मंगळ अभिप्रेत असून त्याला तशा प्रकारची शनी अथवा मंगळ असलेली कुंडली पाहून विवाह ठरवावा, असे शास्त्र सांगते.

लग्ने व्ययेच पाताले जामित्रे चाष्ठमे कुजे ।
कन्या हरति भर्तारं भर्ता हरति कन्यकाम् ॥

असा एक श्लोक मुहूर्त गणपती मध्ये दिलेला असून त्याचा स्पष्ट अर्थ असा आहे, की ज्या कुंडलीत पुढील स्थानात म्हणजे जन्मलग्नी, चतुर्थ, सप्तम, अष्टम व द्वादश या स्थानी वधूच्या कुंडलीत मंगळ असल्यास तो वरास अनिष्टकारक व मारक होतो आणि वराच्या कुंडलीत असल्यास वधूस मारक ठरतो. थोडक्यात पुढील कुंडलीवरून याची स्पष्ट कल्पना येईल.



वरील कुंडलीत फुली मारलेल्या स्थानी मंगळ असल्यास तो दोषयुक्त असतो. अशा प्रकारे मंगळ पाहण्याचा प्रघात आहे. यामुळे अनेक वेळा गुणमीलन होऊनही ग्रहांची स्थिती उत्तम असूनसुद्धा केवळ या मंगळ दोषामुळे बहुतेक ठिकाणी विवाह जुळत आलेला असतानासुद्धा आणि व्यावहारिक दृष्टचा देण्या-घेण्याच्या सर्व बाबींची पूर्तता होऊन विवाह मोडण्यात येतो. तेव्हा ही मंगळाची जी अडचण अल्पज्ञानाने शास्त्राधार न पाहिल्याने केवळ मंगळाचे थोतांड माजवून उद्‌भवते, ती सर्वार्थाने खरी नाही; कारण शास्त्रानेच त्यावर काही उपाय सुचविले आहेत. [त्यांचा साकल्याने विचार केला असता, हे मंगळाचे शल्य सुसह्य होईल, असा विश्वास वाटतो आणि त्यामुळे तत्संबंधी जनमानसात प्रसृत झालेले अपसमजही काही प्रमाणात वा अंशी कमी होतील.

अलीकडच्या काळात वर दर्शविलेल्या स्थानातील सप्तमस्थान अष्टमस्थान व द्वादशस्थान यातीलच मंगळ हा सर्वाधिक दोषयुक्त मानण्यात येतो. उर्वरित स्थानातील मंगळाचा दोष (यामानाने कमी त्रासदायक असून प्रथमस्थान (लग्न) व दशमस्थान यातील मंगळ त्या कुंडलीधारकाला इतर ग्रहांचे संबंध (शुभयोग) विचारात घेता-फलदायक ठरतो. शिवाय मंगळ असेल तर तो दोघांच्या कुंडलीत असावा आणि नसल्यास तो दोघांच्या कुंडलीत नसावा, म्हणजे त्याची अनिष्ट फळे मिळणार नाहीत. या मंगल पाहण्याच्या पद्धतीस काही शास्त्रकारांनी दोष दिला असून एका दोघांच्या मते असा मंगळ पाहण्यात काही अर्थ नाही, असेही ध्वनीत केले आहे. एकाने तर हे मंगळाचे खूळ आहे, असेच स्पष्ट मत मांडले आहे; परंतु मंगळ का पाहिला पाहिजे, या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण दोषयुक्त मंगळामुळे उत्पन्न होणारे दोष हे निश्चितच हानी कारक आहेत. याविषयी ज्योतिर्विदात एकमत आहे. म्हणून वर सांगितलेल्या स्थानातील मंगळ जरी दोषयुक्त असला तरी त्याला सांगितलेल्या अपवादांमध्ये कोणते तत्त्व प्रतिबिंबित झाले आहे, याचा विचार करीत नाहीत. त्यामुळे हा सर्व प्रकार घडतो. मंगळ पाहण्याचे मूळ तत्त्व काय याचा प्रथम विचार करू.

मंगळ, शनी आणि राहू हे उग्र पाप ग्रह असून अनिष्ट परिणाम दर्शक आहेत. मंगळ राहू यांचे परिणाम फार जलद घडतात; तर शनीचे धीम्यागतीने होतात. सप्तमस्थान हे स्त्रीच्या कुंडलीत पतिसुखाचे दर्शक व पुरुषाच्या कुंडलीत रतिसुखाचे किंवा स्त्री-सुखाचे दर्शक सांगितलेले असून त्याचा अनुभवही नेहमी येतो. मंगळ शनी राहू हे पापग्रह असून त्यांची फळे अनिष्ट असतात. तेव्हा ज्या गृहावर वा स्थानावर मंगळाची पूर्ण पापदृष्टी आहे, त्या स्थानात किंवा ज्याच्या योगाने सप्तम स्थानाशी मंगळाचा संबंध पोहोचतो, त्या स्थानात मंगळ असल्यास तो दोषार्ह मानण्यात आला आहे आणि शास्त्र दृष्टचा ते योग्य आहे.

व्ययस्थानी म्हणजे १२ व्या घरात आणि चतुर्थस्थानी म्हणजे चौथ्या घरात मंगळ असल्यास त्याची सप्तमस्थानावर पूर्ण दृष्टी पडते. त्याच प्रमाणे लग्नी व सप्तमात मंगळ असल्यास त्याचेही परिणाम सप्तमस्थानावर होतात. राहता राहिले एक अष्टमस्थान. हे आयुष्य स्थान आहे. [तेव्हा या ठिकाणी मंगळ असल्यास आयुष्य कष्टांकित व संकटग्रस्त होण्याची दाट शक्यता; शिवाय हे स्थान सप्तमस्थानाचे मारक स्थान असल्यामुळे सप्तमस्थानालाच बाधक ठरेल अशा पद्धतीने वर दर्शविलेल्या कुंडलीतील पाच ठिकाणचा मंगळ अनिष्ट मानला गेला आहे आणि त्याप्रमाणे प्रत्यक्षात अनेकांना अनुभवही आले आहेत. म्हणून लग्न जमविण्याच्या वेळी मंगळाच्या स्थानाचा फार काळजीपूर्वक विचार करावा, असे प्राचीन शास्त्रकारांचे प्रांजल मत आहे. तथापि अशाही मंगळाचा फार बाऊन करून विवाहविधीत विघ्न आणू नये कारण वधू आणि वर या दोघांच्या कुंडलीत त्याला काही पर्यायी ग्रहरचना आहे का ते प्रथम पाहावे. शिवाय मंगळ दोषयुक्त स्थानी असल्यास त्याचा विचार करताना अनिष्ट म्हणून सांगितलेला मंगळ जर पूर्ण बलवान असेल, तरच त्याचे अनिष्ट परिणाम घडतात, अन्यथा तो निर्बली असल्यास काही एक होणार नाही आणि खुशाल अशावेळी अन्य ग्रह पाहून व गुणमीलनावर लग्न ठरवावे.

एखाद्या कुंडलीत वर दर्शविलेल्या स्थळी केवळ मंगळ आहे, म्हणून ती मंगळाची कुंडली आहे. असा गैरसमज व अपसमज करून ती कुंडली बाजुला ठेवून देणे ही अत्यंत अन्यायकारक गोष्ट ठरेल कारण अशा कुंडलीच्या बाबतीत जरी अनिष्ट फले व योग संभवत असले तरी सुध्दा ज्यावेळी दुसऱ्या कुंडलीत (वर वा वधू) या मंगळ दोषांवर कुरघडी करणारे ग्रहसामर्थ्य आढळेल, तेव्हा त्याचा विचार प्रथम करावा आणि कुंडली जुळते म्हणून सांगावे. त्यातून काहीही गैर उद्‌भवणार नाही. अशा अपवादात्मक गोष्टींचा विचार पुढीलप्रमाणे शास्त्रशुध्द दृष्टचा मांडता येईल. मंगळाची जी अनिष्ट स्थाने वर सांगितली आहेत, त्यापैकी कोणत्याही ठिकाणी दुसऱ्याच्या कुंडलीत शनी, राहू, यापैकी एक अथवा दोन्ही ग्रह असल्यास, मंगळाचा दोष कमी होतो. त्याचे अनिष्टत्व ही कमी होते. आणि वधूवरांस तो लाभदायक व सुखकारक ठरतो. थोडक्यात इथे मंगळ हा पापग्रह आहे. दुसरा पापग्रह त्याच्या तोडीला विरुध्द बाजूस असला म्हणजे त्याचे अनिष्ट फल नाहीसे होते काट्याने काटा काढण्यासारखे हे तत्त्व आहे. आणि प्रत्यक्षात शास्त्राधारानुसार ते पडताळून सिद्ध झाले आहे. दोन समबल योध्दे, खिलाडू वा वीर एकमेकाला ओळखून असतात व त्यांचे एकमेकांविरुध्द फारसे काही चालत नाही. त्यातलाच हा प्रकार आहे. म्हणजे एकाच्या कुंडलीत मंगळ असल्यास दुसऱ्याच्या कुंडलीत मंगळ, राहू व शनी यापैकी कोणीही या पाच स्थानांपैकी कोणत्याही स्थानी असेल, तर मंगळ दोष नाही, असे समजून निर्धास्तपणे पुढील व्यवहार निश्चित करावा.

हा सर्वसाधारण मंगळाचा दोष निराकरणाचा मार्ग म्हणून ज्योतिषशास्त्रात दिला आहे. आणखी काही तपशिलात गेल्यास असे आढळते की, कुंडलीत दोषार्ह म्हणून जो मंगळ समजला गेला आहे, तो धनिष्टा, मूळ, ज्येष्ठा, विशाखा, मघा, आश्लेषा, आर्द्रा, कृत्तिका, भरणी, पूर्वा, पूर्वाषाढा व पूर्वा भाद्रपदा या नक्षत्रात जन्मकाळी

(पुढील मजकूर पान क्र. २४ वर पहा.)

बदली

लेखक – रा. कृ. वडुलेकर
नाग चौक, ढिकले निवास, पंचवटी, नाशिक.

गेल्या आठवड्यात सकाळी १० च्या सुमारास एक मध्यमवयीन गृहस्थ घरी आले. परिचय झाला. येण्याचे प्रयोजन विचारले.

या इसमाला बदली झाल्याची ऑर्डर निघाली आहे हे पक्के माहीत झाले. दुसरे दिवशी कामावर रुजू झाल्याबरोबर बदलीचा आदेश स्वीकारून बदलीच्या गावाची वाट धरावी लागणार होती; पण या पठ्ठ्याने डाव रचला, ऑफिसऐवजी वाट धरली दवाखान्याची मेडिकल रजेचा आश्रय घेतला.


२८ तारखेला सकाळी ही चर्चा चालू होती. त्यांना१ तारखेला कामावर जाणे भाग होते. म्हणून त्यांना दुसरे दिवशी या म्हणालो ! प्रश्नकुंडली काय म्हणते ते सांगतो. तुम्ही एक संख्या सांगा, ती, १.. २४९ मधील हवी एक अंकी, दोन अंकी, तीन अंकी. त्यानी, सांगितलेली १२५ही संख्या नोंदवून ठेवली. ते परत जाताना म्हणाले, सरकारी डॉक्टर मला फिट करणार आहेत. सर्टिफिकेट घेतले की पहिली सही मस्टरवर व दुसरी सही ऑर्डरवर करावी लागणार आहे. त्यांचे मन चिंताग्रस्त होते.'

फलादेश ऐकण्यासाठी, पुन्हा आल्याबरोबर सांगितले की काळजी करू नका, आपली बदली होणार नाही. तथापी सध्याचे कामाचे स्वरूप बदलले जाईल, पूर्वीच्या विषयाची फाईल व ते टेबल सोडावे लागेल. विनोदाने म्हणालो, फार तर तुमची आवडती खुर्ची नवीन टेबलापाशी न्या ती सोडू नका. हास्य विनोदाच्या वातावरणात त्यांनी दुसऱ्यांदा निरोप घेतला.

पुढे तीन, चार दिवसानंतर १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ते गृहस्थ माझ्या घरी तिसऱ्यांदा आले. चेहऱ्यावर समाधानी स्मित होते आणि हातात पेढे होते, जोडे नव्हते.

वाचकहो अशी आहे कृष्णमूर्ती पद्धत आणि तिची विलोभनीय सुंदरता.

हा प्रश्न वाचकासाठी खाली सोडवून दाखवला आहे. अभ्यास करा, संशोधन करा. कृपया लेखकाशी संपर्क, साधू नका कारण गेल्या महिन्यातील लेखामुळे, माझ्याकडून खुलासा मागणारी बरीच पत्रे आली आश्चर्य म्हणजे एकाही इसमाने पोस्टेज पाठवले नव्हते एकाचे साधे पोस्टकार्ड होते, पण माझ्याकडून उत्तर मात्र बंद पाकिटातून हवे होते.



संख्या – १२५
प्रश्न दिवस – २८–७–८८
प्रश्नवेळ – १६.०५
प्रश्न स्थळ – नाशिक

स्पष्ट ग्रह –

रवी – ३–११–५८–०	चंद्र – ९– २–११–०
मंगळ– ११–१२–२४–०	बुध – ३– ५–२९–०
गुरू – १– ७–२९–०	शुक्र – १–२९–२०–०
शनी R ८ – ३–११–०	राहू – १०–२२–३०–०
केतू – ४ – २२–३०–०	

रवी महादशा गुरू अंतर्दशा
शुक्र विदशा १३–७–८८ ते १–९–८८

गुरुवर्य श्री. ज्योतिंद्र हसबे " कृष्णमूर्ती सिद्धांत " या पुस्तकात म्हणतात (पान १४५ पहा,) दशा अंतर्दशा यांचा संबंध तीन पाच व नऊ ह्या स्थानाशी येतो. त्यावेळी नोकरीत बदल होतात. आणि एखादा ग्रह तीन, पांच व नऊ ह्या स्थानाचा कार्येष असेल पण त्याचा १० किंवा ६ ह्या स्थानाशी संबंध नसेल तर तो बदल देणारच नाही.

अन्य लेखक लिहितो की " चतुर्थ स्थानाचा सबलॉर्ड चतुर्थ भावाचा कार्येश असेल आणि त्याचवेळी लाभस्थानाचा उपनक्षत्र स्वामी १–२–४–१० आणि ११ यांचा अगर एका स्थानाचा कार्येश असेल तर निघालेली, छापलेली बदलीची ऑर्डर कॅन्सल होऊ शकते.

स्थान ३ हे चतुर्थ स्थानाचे व्यय स्थान स्वतःची रहाण्याची जागा बदलावी लागते. कुंडली पहा. प्रश्नवेळी शनी वक्री आहे. शनीच्या पुष्य नक्षत्रात रवी व बुध आहेत तर उत्तरा भाद्रपदा नक्षत्रात मंगळ आहे. तुतियेश मंगळ आहे. मंगळाच्या मृग नक्षत्रात शुक्र आहे तात्पर्य या स्थानाचे रवी, मंगळ बुध, शनी शक्र कार्येश आहेत.

स्थान ५ – या घरात राहू आहे, आर्द्रा, स्वाती, शततारका या नक्षत्रात कोणताच ग्रह नाही पंचमेश शनी आहे शनीच्या नक्षत्रात रवी, मंगळ बुध आहेत. शनीची दृष्टी या स्थानावर आहे. पाचव्या स्थानाचे राहू, रवी मंगळ, बुध शनी हे कार्येष आहेत, शनी वक्री आहे विलंब लावणे हे त्याचे काम, लक्षात असू द्यावे.

स्थान नं. ९– या स्थानात शुक्र आहे. स्थानेशही तोच त्याच्या पूर्वाफाल्गुनी नक्षत्रात केतू आहे या घरावर शनीची ७ वी नजर आहे.

स्थान नं. १० - या स्थानात बुध आणि रवी आहे. बुध दशमेश आहे. बुधाच्या नक्षत्रात ग्रह नाही. रवीच्या नक्षत्रात चंद्र आणि गुरु आहे.

स्थान नं. ११– प्रश्नलाभ आहे की नाही हे समजते. या स्थानी केतू आहे. मूळ नक्षत्रात शनी आहे. रवी लाभेश आहे गुरू आणि चंद्र अनुक्रमे रवीच्या कृत्तिका आणि उत्तराषाढा नक्षत्रात आहेत. म्हणून शनी, रवी, केतू, गुरु चंद्र हे कार्गेश झाले.

इच्छुक अभ्यासकाने इतर स्थानाचे कार्येष ग्रह पाहून ठेवावेत कारण सहावे स्थानामुळे कार्यालयात दैनंदीन हजेरी समजू शकते, अपिलाचे काय होणार हे समजते. आठव्या स्थानामुळे मम्नसिक चिंता समजते. द्वादश स्थानामुळे दूरचा प्रवास. नवीन वातावरण कुटुंबापासून अलग एकलेपणाची जाणीव आणि व्यय याचा मागोवा घेता येतो. प्रत्येक स्थानाचे महत्त्वाचे दोन तीन कार्येष पुरे असतात. कृष्णमूर्ती पद्धतीत दृष्टीला महत्त्व दिले जाते. पण अगदी शेवटी इलाज नसेल तेव्हा कारण पहिल्या चार अवस्थेतील ग्रह प्रबल कार्येष असनात.

या स्थानांचे कार्येश एकत्र घेतले तर सर्वच्या सर्व ग्रह उपस्थित आहेत. आपण समरी घेऊ. शनी वक्री आहे रवी, मंगळ व बुध शनीच्या नक्षत्रात आहेत, शुक्र, राहू व केतू हा गट वक्री, शनीच्या सब विभागात आहेत. हे सात ग्रह तात्कालिक प्रश्नाला दुजोरा देत नाहीत. कारण वक्री ग्रहाच्या नक्षत्रातील ग्रह फले देत नाहीत व वक्री ग्रह फळ देतो पण केव्हा ज्या अंशापासून तो वक्री झाला त्या अंशापर्यंत मार्गी होऊन तो परत आला पाहिजे. आता राहिले चंद्र आणि गुरु हे दोन्ही रवीच्या नक्षत्रात आहेत. शनीच्या सबमधे नाहीत पण यांचा ३ किंवा ९ या स्थानाशी सुतराम संपर्क येत नाही. फक्त गुरूच्या दृष्टीमुळे नवीन वातावरणाशी संबंध येतो; पण दृष्टिची श्रेणी पहिल्या महत्त्वाचा चार चाचणीत धरली जात नाही. या ठिकाणी चंद्र आणि गुरू रवीच्या नक्षत्रात आहेत रवी लाभेष आहे दशमात आहे. लाभ आहे, प्रतिष्ठा आहे. प्रतिष्ठेला तडा नाही. एकूण निष्कर्ष बदली होत नाही.

आता दुसरा नियम पाहू. चतुर्थ स्थानाचा उपनक्षत्र स्वामी राहू आहे. पूर्वाभाद्रपदा नक्षत्रात आहे. नक्षत्रस्वामी गुरू चतुर्थेश आहे. त्याची दृष्टी या स्थानावर आहे. तो अष्टमात आहे म्हणून मानसिक चिंता आहे. लाभस्थानाचा उपनक्षत्रस्वामी केतू आहे तो लाभात आहे. याचा अर्थ प्रश्नकर्त्याला लाभ आहे. बदलीची ऑर्डर रद्द होऊन पदरात लाभ पडणार. द्वादश स्थानाशी गुरूचा दृष्टिसंपर्क आहे म्हणून फार तर वातावरण बदलेल. जवळपास पूर्वीचे दोस्त नसतील. नजीकचा वरिष्ठ दुसरा असेल.

आता दशेचा विचार करू प्रश्नवेळी महादशास्वामी रवी. महाराज आहेत, काय करू शकतात ते तर वक्री शनीच्या पुष्य नक्षत्रात आहेत. अंतर्दशा स्वामी, विदशास्वामी, सूक्ष्मदशा स्वामी यांचे काय चालणार ? हेडमास्तरच विरोधात आहे. बदली होणारा नाही.

शेवटी रूलींग प्लॅनेटचा विचार करू.

प्रश्नवेळी गुरू, रवी, शनी, गुरू हे चार ग्रह अनुक्रमे लग्न स्वामी, नक्षत्रस्वामी, राशीस्वामी दिवसस्वामी म्हणून आहेत. यापैकी शनी वक्री म्हणून तर रवी शनीच्या नक्षत्रात म्हणून बाद करू. आता एकमेव रूलींग प्लॅनेट गुरू उरला. गुरूचा तीन किंवा ९ स्थानाशी संबंध नाही. गुरूचा लाभस्थानाशीच प्रबळ संपर्क आहे. तात्पर्य रूलींग प्लॅनेट बदली होणार नाही असे सांगतात व झाली तरी विलंबाने.

वाचकहो सर्व तऱ्हेने अंदाज घेतला व बदली होणार नाही हा फलादेश.

कृष्णमूर्ती पद्धतीस मनापासून नमस्कार.

कुंडलीवरून तीळ व भाग्य

लेखक – श्रीधर गोडे
ज्यो. भास्कर, रामनगर वर्धा ४४२००१.

बालकाची जन्मकुंडली तयार करताना त्याच्या शरीरावर कोणकोणत्या ठिकाणी तीळ, मस किंवा लायसे (लाच्छन) असेल हे तत्कालीन ग्रह परिस्थितीवरून सांगता येते व पृच्छकास थोडासा आश्चर्याचा धक्का देता येतो. पूर्वीच्या काळी नष्टपत्रिका तयार करण्यासाठी अंगावरील तीळ, मस किंवा लाच्छन यांचा विचार करण्याचा प्रघात होता. जस जसे वय वाढत जाईल तस तसे तीळ किंवा मसीचे मोटे होणे दृष्टीपथास पडते. काही तीळ समान चिन्हे नष्ट होतात. तर काही आकस्मिक अंगावर उठतात. जन्मकुंडलीत प्रत्येक राशीने शरीराचा कोणकोणता भाग दर्शविला जातो, हे पुढीलप्रमाणे आहे.


१) मेष – तोंड, डोळे	२) वृषभ – मान गळा
३) मिथुन – खांद, बाहू	४) कर्क – छाती, स्तन व कुशी
५) सिंह – पाठ, पाठीचा कणा, हृदय	६) कन्या – नाभी
७) तुळ – कमरेचा भाग, जांघ	८) वृश्चिक-गुप्तेंद्रिय, गुदद्वार
९) धनु – मांड्या	१०) मकर – गुडघे, पोटऱ्या
११) कुंभ – घोटे, पाय	१२) मीन – पाऊल, बोटे

लग्नेश ज्या राशीत असेल ती रास, जन्मरास व त्याचा अधिपती जिथे असेल ती रास, तसेच षष्ठेश ज्या राशीत असेल ती रास, तीळ, मस किंवा लायसे समान खूण शरीरावर दर्शविते. कारक ग्रह कुंडलीत कोठे आहे त्या योगाने शरीरावरील तीळ, मसादि चिन्हांची खूण गाठ बांधता येते. षष्ठेश, लग्नेश व चंद्राची रास विषम म्हणजे १, ३, ५, ७, ९, ११ असेल तर वरील खूण शरीराच्या उजव्या भागात आढळते. त्याउलट वरील कारकेश सम राशीत असता शरीराच्या डाव्या भागास तीळ असतो असे जाणावे. तसेच षष्ठेश, लग्नेश व चंद्र रास कुंडलीच्या अनुदीत भागात म्हणजे २, ३, ४, ५, ६ स्थानी असतील तर तीळ समान चिन्हे शरीराच्या मागच्या भागास व हे कारकेश कुंडलीच्या उदीत भागात म्हणजे लग्न ते सप्तम स्थानात असल्यास शरीराच्या पुढील भागास तीळ आढळतो. तीळाचे व मसाचे प्रकार अनेक जरी असले तरी प्रामुख्याने काळा, लाल, हिरवा, भुरा तसेच काही तीळ केस युक्त असवात. हिरवा तीळ वंशातील व्यक्ती पुन्हा जन्माला आल्याचा द्योतक आहे. लाच्छन लाल, काळा किंवा केस युक्त चट्टा असतो.

ग्रह ज्या द्रेष्कोणात पडला असेल त्याप्रमाणे तीळ त्या त्या अवयवाच्या वर, मध्य किंवा खालील भागास आढळतो. १० अंशापर्यंत वरील भाग, १०–२० अंशापर्यंत मधला व २०–३० अंशापर्यंत खालचा भाग दर्शित होतो. समजा लग्नेश मेष राशीत १० अंशात असल्यास तीळ चिन्ह कपाळावर दिसेल त्याप्रमाणे इतर अंशाचे जाणावे.

खालील कुंडलीचा अभ्यास केला असता तीळ पुढीलप्रमाणे निदर्शनास आलेत.

जन्मकुंडली (६–७–४९)



(पुढील मजकूर पान क्र. ३१ पहा.)

संशोधक आणि अभ्यासक

लेखक – मधुसुदन ह· भट्ट
श्री भद्रकाली ज्योतिष कार्यालय, रूम नं. ५, आणि ६ गौतम निवास, ८३६ बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणे.

ज्योतिषशास्त्रात कोणाला आवड नाही. आपल्या दैनंदिन जीवनात पदोपदी ज्योतिषशास्त्राची आवश्यकतेवर जाणीव होत असते. उदाहरणार्थ गृहप्रवेश, वास्तुशांती, अन्नप्राशन, लक्ष्मीपूजन इत्यादी.

शुभमुहूर्त निश्चित करतेवेळी ग्रहांच्या स्थितीच्या अभ्यासासाठी गणिताची मदत घ्यावी लागते आणि शुभकार्याचा प्रारंभ केव्हा करावा ती गोष्ट निश्चित होत असते.

कलगणनासाठी पाश्चात्त्य पद्धतीने तास, मिनिट आणि सेकंदचा सर्वथा उपयोग करीत असतो. एक अहोरात्रीचा २४ वा वार म्हणजे तास (एक) एक तासाचा ६० वा भाग म्हणजे एक मिनिट. एक मिनिटाचा ६० भाग म्हणजे एक सेकंद, म्हणजेच अहोरात्रीच्या २४ x ६० x ६० = ४८,४०० एवढी सूक्ष्मता आपण आणू शकतो

आपली भारतीय प्राचीन पद्धतीनुसार सर्वसामान्य प्रचलित घटिका, पल विपल २,१६,००० पर्यंत जाऊ शकतो. दक्षिण भारतात त्याच्या पेक्षाही अतिसूक्ष्म पद्धतीने जाऊ शकतात. स्व. देवज्ञ श्री. जे. कृष्णस्वामीच्या पुस्तकात, " भारतीय ज्योतिषशास्त्र " या पुस्तकात कालगणनेचे कोष्टक नमूद केलेले आहेत ते अपूर्ण आहेत.

अहोरात्र = ६० घटि	१ लिप्त = ६० विलिप्त
१ घटि = ६० विघटि	१ विलिप्त = ६० परस
१ विघटि = ६० लिप्त	१ परस = ६० तत्परस

याप्रकारे सर्वसाधारण १ दिवसाचा २,१६,००० लिप्त किंवा विपल एवढया भागाने संतुष्ट न होता – ४६, १५, ६०, ००, ००० एवढी सूक्ष्मता जाऊ शकते.

जसे काळाच्या बाबतीत एवढी सूक्ष्मतापर्यंत गेले आहेत तसेच त्या पद्धतीने अंतर ( ) च्या बाबतीत पण असावयास पाहिजे. ग्रह सूर्याच्या आसपास अंडाकारमध्ये भ्रमण करीत असते त्याची नोंद पंचांग ठेवते. जन्मकुंडली बनवतेवेळी या ग्रहांच्या गतीच्या आधारे स्पष्ट लग्न, दशम, आणि ग्रहांची स्पष्ट स्थिती जातकच्या जन्मानुसार निश्चित करण्यात येत असते. सध्या वर्तमान काळात जातकाची जन्मवेळ सर्वसामान्य रितीने तास आणि मिनिट एवढयापर्यंतच मर्यादित आहे आणि सर्वसामान्य लोक एकच तास आणि मिनिटाची नोंद ठेवत असतात. किंतू हे अपूर्ण आहे. जन्मवेळेनुसार निश्चित तास, मिनिट आणि सेकंद हे अत्यंत आवश्यक आहे. या चौकसपणाचा खरोखर उपयोग पलकथनाच्या वेळी होत असलेले योग ( ) समय नक्की करण्यात येत असतो. वर्षकुंडलीच्या वेलीपण हे अत्यंत महत्त्वाचे घटक ( ) आहे.

स्पष्टलग्न, दशम आणि ग्रहगतीचे तास, मिनिट आणि सेकंदचे कोष्टक तयार करतेवेळी एक गोष्टींची न्यूनता, दृग्गोचर झालेली आहे ती प्रस्तुत करीत आहे. आपले पूर्वाचारांनी एक वर्तुळाचे (३६०) भाग केलेले आहेत आणि प्रत्येक एकमचा (युनिट) म्हणजे अंश म्हणून ओळखले जातात. आणि प्रत्येक अंशाच्या साठाव्या भागाला " कला " आणि प्रत्येक कलेच्या भागाचा (विकला) आणि प्रत्येक विकलेल्या साठाव्या भागाला " प्रतिविकला " ही संज्ञा दिलेली आहे. एवढे सूक्ष्मपर्यंत सध्या वर्तमान कालीन ज्योतिर्विद गेलेले आहेत. परंतु मी अत्यंत नम्रपणे या ज्योतिषशास्त्राचा विद्यार्थी म्हणून प्रतिविकलेची पुढे चारपावले जाण्याची दृष्टता करीत आहे

जर चोवीस तासाचे कुठल्याही ग्रहाची गती एक विकला असेल तर एक सेकंदमध्ये त्याची गती किती असेल ? या बाबतीत मी माझ्यापेक्षा थोर विद्वान लोकांना विचारले; परंतु मला संतोषकारक प्रत्युत्तर प्राप्त झाले नाही. किंतू खोल विचारांती असे दिसून आले की, " वि " आणि " प्रति " उपसर्गाचा उपयोग अनेक ठिकाणी करण्यात आला आहे.

विंशतली दशामध्ये महादशा, आंतरदशा आणि आंतर दशांसाठी प्रत्यंतर दशा (प्रति+अंतर) व तत्पश्चात आंतरदशांकरीता " विदशा " (विशेष+दशा) तसेच त्यापुढची आंतरदशाकरीता " सूक्ष्मदशा " अशी सज्ञा देण्यात आली आहे. आणि ह्यामुळे मला मार्ग सापडला.

सध्या प्रचलित कोष्टक खालील प्रमाणे आहे.

१) एक अंश = ७कला ३) १ विकला = ६० प्रतिविकला
२) १ कला = ६० विकला किंवा (प्र. वि. कला)
४) १ प्रविकला = ६०

उपर्युक्त प्रविकला पर्यंत विभाजन पेक्षा अति सूक्ष्मताची आवश्यकता दिसून आली आहे. त्यासाठी अतिसूक्ष्म विभाजन निम्न लिखित आहे.

१) प्रविकला = ६० वि सूक्ष्म कला
२) सूक्ष्मकला = सूक्ष्मकला
३) १ वि सूक्ष्मकला = ६० प्रति सूक्ष्मकला
४) १ प्रतिसूक्ष्मकला = ६०:अतिसूक्ष्मकला

भाविकालात विज्ञानाच्या सहाय्याने अतिसूक्ष्मताचे आग्रही गणित करावयाचे झाले तर आत्तापर्यंत मला, जी दगदग जो त्रास सहन करावा लागला तसा त्रास दगदग त्याच्या वाट्याला येऊ नये ह्यासाठी खटाटोप केलेला आहे.

बाबी गणित रसिक जनांना चटकन समजेल त्यासाठी त्यांच्याच पद्धतीने निम्नलिखित पद्धती नमूद करीत आहे.

वर्तुळाचा ३६० भाग = १ अंश.

१) १ अंश ६० भाग = कला = १–६०
२) १ कलाचा ६० वा भाग = विकला = १–६० २
३) १ विकलाचा ६० वा भाग = प्रतिविकला १–६० ३
४) १ प्रतिविकलाचा ६० = सूक्ष्मकला १–६० ४ क्ष.
५) १ सूक्ष्मकलाचा ६० भाग = वि सूक्ष्मकला १–६० १क्ष
६) १ वि सूक्ष्मकलाचा ६० भाग = प्रतिसूक्ष्मकला = १–६० १ 'क्ष'
७) १ प्रतिसूक्ष्मकलाचा ६० भाग = अतिसूक्ष्मकला = १–६० ७ 'क्ष'

लग्नकालाचं सूक्ष्मत्व

स्वस्थे नेर सुखासीने यावत्स्पन्दति लोचनम्
तस्य त्रिशत्तोमो भागस्तत्पर: परिकीर्तित: ।
तस्मा छततमो भागस्त्रुटिरित्या भिधीयते ।
त्रुटे : सहस्रभागो यो लग्नकाल: स उच्चते
देवे पि तंन जानाति किं पुन: प्राकृतो जन:
स कालो कालो पन्यकालो वा पूर्वकर्मवशांभ्दवेत ।
निमित्त मात्र देवज्ञस्तद्वाशांच्च शुभासुभम् ।।

ज्या मनुष्याचे चित्त पूर्ण स्वस्थ आहे, त्याच्या डोळ्याची पापणी हालण्यास जेवढा वेळ लागतो त्याला निमिष असे म्हणतात. या निमिषाचा ३० व्या भागाला तत्पर " तत्पर " असे म्हणतात आणि तत्पराच्या १०० व्या भागाला त्रुटि असे म्हणतात. त्रुटीच्या १००० व्या भागाला लग्न काल म्हणतात. तो इतका सूक्ष्म असणारा लग्न काल देवांना देखील समजणे कठीण, मग मनुष्यांना तो कसा समजेल. १ तो लग्न काल किंवा इतर कोणताही काल प्रत्येकाच्या पूर्व कर्मा प्रमाणे फलदायक होत असतो. ज्योतिषी व त्याने सांगितलेले शुभाशुभ फल हे केवळ निमित्त मात्र होय.

१८ निमेष = १ काष्टा, ३० काष्टा = १ कला, ३० कला = १ विघटिका, ६० प्रति वि पले = १ विपल (१ गुरू अक्षर उच्चारण्यास लागणारा वेळ) १० वि. पले = १ विले = प्राण ७ विपले = १ पल (विनाडी) ६० पले = १ घटिका (नाडी) २॥ विपले = १ सेकंद २॥ पले = १ मिनिट, २॥ घटिका = १ तास, ६० सेकंद = १ मिनिट ६० मिनिट = १ तास, ६० टक्के किंवा २४ तास = १ दिवस (अहोरात्र.)

*

(पान क्र. २९ वरून पुढे चालू)

ह्या कुंडलीत लग्नेश बुध मिथुन राशीत आहे. मिथुन राशीचा अंमल खांदा व बाहू या अवयवावर असतो. बुध १२अं. आहे त्यामुळे तीळ चिन्ह दंडावर आढळले. षष्ठेश मंगळ असून तो २६ अंशात वृषभ राशीत आहे. मानेच्या खालच्या भागावर तीळ आढळला. जन्मरास तुळ आहे. तुळ राशीचा जांघा व कमरेच्या भागावर अंमल असल्यामुळे जांघेत तीळ आढळला. तसेच पंचमेश शुक्र धनात असल्यामुळे कुशीवर तीळ आढळला.

दोन किंवा चार ग्रहांची युती विशेषत: रवुचंमं, राहूमंगळ, शनिमंगळ शनीचंद्र लग्नात असता लाच्छन किंवा मस हे चिन्ह शरीरावर हमखास दृष्टीपथास पडते. शिवाय मंगळ, गुरु, शुक्र ज्या राशीत असेल त्या राशी दर्शक अवयवावर तीळ आढळतो. शेकडा ७५ ते ८० टक्के बाबीत वरील अनुभव प्रत्ययास येतो.

हातात शनी ग्रहाच्या उंचवट्यावर तीळ असेल तर त्या मनुष्यास उंचावरून पडणे, घोडा चावणे, विषबाधा होणे, तसेच सर्पादि (सरपटणारे) विषारी प्राणी चावणे आदीची भीती असते. ह्या व्यक्तीचा भाग्योदय होण्यास अनेक अडचणी येतात. मिथुन राशीत शनी, राहू मंगळ ग्रह असता तळहातावर शनी ग्रहाखाली तीळ आढळतो. मेष राशीत लग्नस्थानी चंद्र शनी असता डोक्यावर तीळ दिसतो. अशी व्यक्ती बिलंदर असते. कर्क राशीत शुक्र धनात असता कुशीवर ताळ असतो. ह्या मनुष्यास संपत्तीची कधीही वाण पडत नाही व मान सन्मान चांगला मिळतो. शरीरावर लायस (लाच्छन) जन्मापासून असल्यास अशी व्यक्ती भाग्यशाली व सुखी असते व ती अधिकारावर असते. ही व्यक्ती घराण्यात पूर्वजांपैकी कोणीतरी व्यक्ती जन्मास येते. साधारणत: षष्ठेश शनी असून तो उच्चराशीत चंद्रासोबत असल्यास शरीरावर लायसे उठते.

थोडक्यात रव्यादि ग्रहांचे वास्तव्य तीळ, मसाच्या स्वरूपात तुमच्या शरीरावर असून त्याची चाचपणी जन्मकुंडलीवरून करता येऊ शकते. भाग्य व फलादेश, " तीळ आणि भाग्य " या ग्रंथावरून पडताळून पाहता येईल.

श्रीकृष्णार्पण !

लेखांक ७ वा

सलज्जता, विनय पण आतल्या गाठीची बुधाची "कन्या"

लेखक : प्र. सु. आंबेकर

अध्यक्ष ज्योतिर्विद्यालय (मुंबई) ३६ सर्वोदय भुवन (अ) गोखले रोड मार्ग, दादर मुंबई ४०००२८.

"कन्या" ही राशीचक्रामध्ये सर्वात तरुण राशी आहे. ही यौवनातील कुमारिका आहे.

राशीचक्रात ही ६व्या क्रमांकाची राशी आहे. ती सहा या सम अंकाने दर्शविली जात असल्याने स्त्री राशी आहे. ही पृथ्वी-तत्त्वाची व द्विस्वभावी राशी आहे. तसेच मानव व अल्पप्रसव राशी आहे. या राशीचा स्वामी बुद्धिमान असा बुध आहे. ती बुधाचीच मूल त्रिकोण व उच्च राशी आहे. या राशीत बुध १ ते १५ अंशापर्यंत उच्च, १६ अंश ते २० अंशापर्यंत मूल त्रिकोण व २१ ते ३० अंशापर्यंत स्वगृह धरले जाते. एकाच राशीत एखाद्या ग्रहाचे उच्च, मूल त्रिकोण व स्वग्रह असणारी ही एकच राशी आहे, तर शुक्राचीच ही नीच राशी आहे.

या राशीचीं भौगोलीक घडण म्हणजे या राशीचा निरयन भोग किंवा क्रांतीवृत्तावरील लांबी १५० अंश ते १८० अंशावर आहे. या राशींत उत्तराफाल्गुनी नक्षत्राचे २।३।४ हे तीन चरण हस्त नक्षत्र संपूर्ण व चित्रा नक्षत्राचे पहिले दोन चरण मिळून ही राशी तयार झालेली आहे. या राशीत आलेली सर्व नक्षत्रे सुंदर, बुद्धिमान, कलाकार पण सत्वगुणी असल्याने या राशीत सौंदर्य, विनय, बुद्धिमत्ता सौंदर्यदृष्टी, हे सर्व गुणधर्म ठळकपणे दिसून येतात. या राशीची आकृति नौकेत बसलेल्या व जिच्या एका हातात धान्याचे कणीस व दुसऱ्या हातात विस्तव आहे अशी नौकेत बसलेली कुमारिका असे आहे तर काहींच्या मते बागेत बसलेली कुमारिका असे आहे. राशीचा स्वामी बुध व नक्षत्रांचे स्वामी रवी, चंद्र व मंगळ असल्याने या राशीत बुधाची अप्रतिम बुद्धिमत्ता, रवीचे कर्तृत्व, चंद्राची कल्पनाशक्ति व मंगळाचे चापल्य व तापटपणा यांचा सुंदर संगम झालेला दिसून येतो. इंग्रजीत या राशीचा Urigo असे म्हणतात व त्याचे चिन्ह roc असे आहे.

ही स्त्री राशी असल्याने व त्यातून कोमल राशी असल्याने निसर्गतः या राशीत स्त्रीचा कोमलपणा, संसाराची आवड, विनय, कुटुंबवत्सलपणा, परावलंबित्व हे गुण प्रामुख्याने दिसून येतात. मात्र ही राशी वैश्यगुणधर्माची असल्याने स्वार्थीपणा, रजोगुण, पक्केपणा व्यवहार कुशलता, देण्याघेण्याची प्रवृत्ती, व्यापारी प्रवृत्ती दिसून येते, पृथ्वीतत्त्वाची असल्याने लाजाळू, विनय, नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा, घाटदारमांडणी, समयसूचकपणा, आकर्षकमांडणी, सोशिकपणा हे गुण दिसून येतात. द्विस्वभावी असल्याने दुटप्पीपणा, धरसोडवृत्ति, बोलणे व कृती यांत फरक, थोडी आंतल्या गाठीची, विचार व मन वारंवार बदलणारी, थोडचा लाव्यालाव्या, खुषमस्करी, संधिसाधुपणा, मस्केषणी व चहाडखोरपणा असणारी आहे.

मात्र या राशीत सूर्य आला की पावसाळा संपत आलेला असतो म्हणून जिकडे तिकडे हिरवेगार दिसते व धान्य व वनस्पती जास्त निर्माण होते. त्यातून या राशीची आकृतीही जिच्या एक हातात कणीस व दुसऱ्या हातात विस्तव आहे अशी मुलगी असल्याने तिला संसाराची व स्वयंपाकाची फार आवड आहे. जणू काही लोकांना अन्नदान करणारी आहे.

ही स्त्री रास असली तरी ही कुमारिका आहे. हिचे चित्र उपवर किंवा यौवनात शिरणाऱ्या १६ व्या वर्षाच्या उपवर मुलीसारखे आहे त्यामुळेच तिच्या भावना जागृत आहेत. ती कुमारिका असल्याचे गर्दीमध्ये पुरुषाचा झालेला स्पर्श किंवा पुरुषाचा धक्का

चुकून लागला की मुद्दाम केला हे तीला बरोबर कळते. (पुरुषांनो कृपया Practical करून बघू नका.

मुखसामुद्रिक व सर्वांग शरीर लक्षणाप्रमाणे ज्या राशींच्या व्यक्ती सहज ओळखता येतात. यांचा बांधा मध्यम उंच. पण ठेवण जरा आडवी. मात्र फार लठ्ठ किंवा जाड नाही. बांधा प्रमाणशीर व प्रमाणबध्द असतो. अवयव गोलाकार असतात. मात्र फार लठ्ठ किंवा फार बारीक नसतात. अवयव थोडे शिथील असतात. कपाळ भव्य पण डोके व चेहरा गोल असतो. गाल थोडे फुगीर व नाक मोठे असते. यांच्या बांध्याचे एक वैशिष्टय म्हणजे शरीराची प्रमाणबध्दता त्यांचे सर्व अवयव एकमेकाला प्रमाणशीर असतात. जेवढी छाती तेवढेच पोट जेवढे दंड तेवढेच खांदे वगैरे. अवयवांची लांबी रुंदीही प्रमाणशीर असते. आकृति कुमारिकेची असल्याने ह्या व्यक्ती चिरकाल तरुण दिसणाऱ्या असतात. म्हातारपणीही चेहऱ्यावर सुरकुति येत नाही. म्हातारपणीही त्या पोरसवदा वाटतात त्यांचे शरीर व अवयवही आहे तसेच प्रमाणबध्द राहातात. फार लट्ठ किंवा बारीक अथवा सुटलेले दिसत नाहीत. मात्र स्त्री लक्षणे जास्त दिसतात. चालणे गजगतीसारखे म्हणजे जरा आळसत व चालताना थोडी कंबर हालवत व हात जास्त हालवत चालतात. थोडे डुलतडुलत चालतात.

या व्यक्तींचा स्वभाव तसा नम्र, विनयशील, आज्ञाधारक असतो. तसेच व्यवहारीकपणा, चुणचुणीतपणा व काम करण्याची वृत्ती चांगली असते. समजुतदारापणा व जुळते घेण्याची वृत्ती, हुजरजबाबीपणा, कार्यतत्परता, संगोपनवृत्ती व संसाराची आसक्ती बरीच दिसून येते. त्या आळशी नसल्या तरी जरा संथ असतात. श्रम कष्ट किंवा मेहनतीची आवड असली तरी ढोरमेहनत किंवा अतिरेकीपणा नसतो. फारशी धडाडी, शौर्य किंवा महत्त्वाकांक्षा नसते. मिथुन व कन्या दोन्ही बुधाच्या राशी असल्या तरी त्यांच्यात बराच फरक आहे. मिथुन ही बोलकी व बडबडी आहे, तर कन्या जरा अबोल व घुमीच आहे. मिथुन राशींच्या व्यक्ती कृतिपेक्षा बोलण्यावर जास्त भर देतात तर कन्या रास कृतीवर जास्त भर देते. मिथुन वक्तृत्व व संभाषणाला चांगली तर कन्या गणित व जमाखर्चाला चांगली. मिथुन धरसोडवृत्तीची तर कन्या धीम्या स्वभावाची आहे. मिथुन रास सर्व ओकून टाकणारी तर कन्या रास मनात साठवणारी आहे. मिथुन मोकळ्या मनाची तर कन्या आंतल्या गाठीची आहे. मिथुन दळणवळण करणारी तर कन्या संग्रह करणारी आहे. मिथुन उथळ तर कन्या बसकी आहे.

ही रास पुरुषांना फारशी अनुकूल नाही कारण पुरुषांना लागणारे धाडस, शौर्य पराक्रम व महत्त्वाकांक्षा हे गुण यांच्यामध्ये नाहीत. या राशीवर जन्मणाऱ्या व्यक्ती तशा मध्यम उंच, प्रमाणशीर आडवा बांधा चेहरा सुरेख; पण विशेष स्त्री लक्षणे असणाऱ्या असतात.

स्त्रियांना मात्र ही रास फारच चांगली आहे. कारण स्त्रियांना लागणारे रूप, सौंदर्य, पाकशास्त्र, संसाराला लागणारे गुण, संगोपन करण्याची वृत्ती, दया, अपत्यप्रेम, परावलंबित्व हे गुण चांगलेच विकसित होतात. या राशीवरच्या स्त्रियाही मध्यम उंच, थोडा आडवा, पण प्रमाणशीर बांधा, सुडौल नीटनेटका प्रमाणबध्द शरीर. असणाऱ्या असतात. चेहरा गोल पण सुंदर. देखण' सुस्वरूप पण चेहऱ्यावर सात्त्विक तेज असते. चेहरा शांत व प्रसन्न असतो. मात्र राहाणी साधी असली तरी स्वच्छ व्यवस्थित व नीटनेटकी असते. त्यांना तसे भडक व फार फिक्कट रंगही आवडत नाहीत. फार आधुनिक फॅशन, रंगरंगोटी अथवा नटणेमुरडणे आवडत नाही, तर त्यांचा जास्त भर देवाने दिलेल्या नैसर्गिक सौंदर्यावरच असतो. रंगसंगती बरीच प्रिय असते. दांत पांढरे व स्वच्छ असून हसताना एका सरळ रेषेत एखाद्या माळेतल्या मोत्याप्रमाणे सुंदर व उठून दिसतात. वृषभेच्या स्त्रीसारखी ती धनिक व अलंकाराने नटलेली जमीनदारीण नाही. कर्केच्या स्त्रीसारखी राजाची पट्टराणी नाही. वृश्चिकेच्या स्त्री सारखी हट्टी कैकेयी नाही, मकरेच्या स्त्रीसारखी शिरा दिसणारी कामकरीन नाही किंवा मीनेच्या स्त्री सारखी विलासी व सुस्त स्त्री नाही तर ती चुलमूल सांभाळणारी संसारी गृहिणी आहे. संसाराला या स्त्रिया फारच उत्तम. घरामधील व्यवस्थितपणा नीटनेटकेपणा सामानाची थाटदार व आकर्षक मांडणी (उदाहरणार्थ एकाच ओळीत घासलेली स्वच्छ पितळेची किंवा स्टेनलेसस्टीलची भांडी, कपाट, टीव्ही, पलंग, टेबल यांची व्यवस्थित मांडणी) फारच चांगली जमते. उंची फर्निचर, चैनीच्या किंवा भारी किमतीच्या वस्तू नसल्या तरी घरात सुबक व आकर्षक मांडणीमुळे साधे घरही सुंदर वाटते. या स्त्रियांना हस्तकला कौशल्याची विशेषतः शिवणकाम, भरतकाम, रांगोळी, कशीदाकाम, चित्रकला, रंगकाम, यांची फार आवड असते. तसेच त्यांना बाजारी किंवा हॉटेलच्या खाण्यापेक्षा घरगुती पदार्थच आवडतात. या स्त्रिया फार लाजाळू व जरा अबोल असतात.

ही एकच रास अशी आहे की जी पुरुषांचे व स्त्रियांचे वेगवेगळे गुणधर्म दाखवते. दोघांचे गुण किती विरोधी असतात. या राशीवरचे पुरुष समाजकार्य करणारे, मदत करणारे व घरच्यापेक्षा घराबाहेर जास्त लक्ष देणारे असतात. थोडक्यात संत तुकारामासारखे (संत तुकारामाची रास कन्या होती.) या उलट या राशीवरच्या स्त्रिया अगदी स्वार्थी व स्वतःच्या संसाराकडे जास्त लक्ष देणाऱ्या असतात. त्यांना खऱ्या स्त्रीचे गुण बरोबर जमतात. तशा त्या पक्क्या व्यवहारी व रजोगुणी असतात. (थोडक्यात संत तुकारामांच्या पत्नी सारखी. तिचीही कन्या रास होती.) तशा या स्त्रिया संसारी, व्यवहारी, काटकसरी, कष्टाळू व पती आणि मुलांवर फारच प्रेम करणाऱ्या व सेवा करणाऱ्या असतात. कन्या राशीसारखी संसारी व पतीला देव मानणारी स्त्री दुसरी नाही. कितीही गरीबी आली, संकटे आली, झोपडीत राहण्याची वेळ आली (सिनेमातली झोपडी नाही) तरीही ती आपल्या पतीला सोडून जाणार नाही. खरी आर्य स्त्री मात्र सर्व सत्वगुण असले तरी प्रत्येक राशीत एखादा दुर्गुण असतोच. या राशींच्या स्त्रियांचा एकच वाईट गुण असतो तो म्हणजे दुसऱ्या स्त्रियांना नावे ठेवणे. शेजारणी बद्दल असूया असणे यांचे लक्ष नेहमी शेजारणीच्या घराकडेच असते.

शेजारच्या विमलाताईंकडे आपल्या पेक्षा जरा चांगली वस्तू आली की लागलेच यांच्या पोटात दुखायला. समजा शेजारच्या विमलाताईंकडे गोदरेजचे मोठे कपाट आणले की त्या अस्वस्थ होतील त्यांच्या मनात सारखे हे कपाट केवढ्याला आणले ? त्यांना कसे परवडले ? हजारो प्रश्न उभे राहून त्यांची पोटदुखी सुरू होईल. मग या पोटदुखीवर औषध म्हणजे त्यांना डॉक्टरकडे न नेता विमलाबाईंकडे नेऊन सर्व माहिती द्यावी. ह्या स्त्रिया बऱ्याच धूर्त असतात. त्या अगदी सरळ शेजारणीच्या घरात डोकावणार नाहीत तर दरवाज्यात उभे राहून आपण लांब दूरवर बघतो असे दाखवीत पण त्यांची तिरपी दृष्टी मात्र शेजारच्या विमलाबाईंच्या घराकडे असेल. अरे बापरे ? यांच्या घरातून एकदम ही ५ । ६ मंडळी कशी बाहेर पडली ? त्यात एकजण अगदी तरुण दिसतो. तर एक पुरुष व बाई जरा म्हातारी दिसते. सगळ्यांनी नीटनेटका पोशाख केला आहे काय आहे हा ? हे विमलाबाईंच्या मुलीला लग्नासाठी बघायला आलेले दिसतात. असे हजार प्रश्न मनात करतील. तसेच दुसऱ्याच्या पदार्थाला किंवा गोष्टींना नावे ठेवण्याचीही त्यांना सवय असते. त्यात त्यांचे डोके फारच सुपीक असते. समजा दिवाळी आहे मग शेजारच्या विमलाताईंचे दिवाळीचे पदार्थ कसे काय झाले हे पहायचे आहे तेव्हा विमलाताईंकडे सरळ जाऊन काही हे पदार्थ मागता येत नाहीत. मग त्या काय करतात. घरातले एखादे मोठे ताट घेतात त्यात लहानात लहान लाडू किंवा चकली वगैरे ठेवून त्यावर वस्त्र घालून त्या विमलाताईंना नेऊन देतात. बरे का ? विमलाताई अहो दिवाळी आहे. थोडं फराळाचं घ्या. साहजिकच विमलाताईंनाही त्यांना फराळाचे देऊन परत फेड करावी लागते. मग ते फराळाचे आले की, या बाईसाहेब चकली फार कडक आहे, छी लाडू फोडताच येत नाही इतका कठीण आहे. अशी नावे ठेवायला सुरुवात आहे की नाही सुपीक डोके असो. या स्त्रियांकडे सेवावृत्तीचा गुण फार चांगला आहे, कन्या राशीच्या स्त्रियांना लैंगिक विषयांचा मात्र तिटकारा असतो. म्हणून बऱ्याच वेळा या स्त्रिया विवाह न करता एकट्या राहिलेल्या दिसून येतात. समाजातील बऱ्याच प्रौढ कुमारिका देखील कन्या राशीच्याच दिसून येतील. बऱ्याच वेळा त्या विवाह न करता नर्स किंवा मेट्रन वगैरे झालेल्या दिसून येतील. एखाद्या मोठ्या कुटुंबात देखील त्या एखाद्या कोपऱ्यात निराळ्या झोपताना दिसून येतील.

कन्या राशीचे पुरुष बऱ्याचवेळा त्यांच्या कृतीमुळे ओळखू येतात. त्यांना बहुधा पानसुपारीचेही व्यसन नसते. तसेच कन्या रास थोडी जुन्या वळणीची व पौर्वात्य विचारसरणीची आहे. आधुनिक पाश्चात्य किंवा सिनेमासंगीतापेक्षा नाट्य संगीत जास्त प्रिय आहे. ह्या पुरुषांना एखाद्या कृतीबरोबरच डुलत चालायची बरीच सवय असते. उदा. रात्री जेवण झाल्यावर, लेंगा शर्ट वगैरे घालून एका हाताने चाव्या फिरवीत व त्यांच्या तालात डुलतडुलत व तोंडाने " हा नाद सोड ऽ सोड ऽ असे नाटकातील गाणे म्हणत जायला लागला की खुशाल समजावं की हे कन्या राशीचे ध्यान आहे.

या राशीखाली येणारा वर्ग समाजातील बराचसा बुद्धिमान देवभक्त, सुशील व प्रतिष्ठीत मध्यम वर्गातला असतो. या राशीखाली हिशोबनीस, बँका, खाजगी कंपन्या किंवा सरकार दरबारी कामे करणारा वर्ग सर्व वस्तूंचे किरकोळ व्यापारी विशेषत: धान्य, तेलबिया, किराणामाल, कागद, स्टेशनरी, पुस्तके, छापखाने, औषधी पदार्थ, संसाराला लागणाऱ्या सामानाचे पदार्थ यांचे विक्रेते. संपादक बातमीदार, वर्तमान विक्रेते, फिरते एजंट प्रकाशक, लेखक, शिक्षक वर्ग, प्रोफेसर्स, पोस्ट, तारखाते किंवा दळणवळण खात्यात नोकरी करणारा वर्ग, नर्स, मिडवाईफ, तसेच डॉक्टर्स, आर्किटेक्ट, चित्रकार, कलाकार, संगीतकार, दुकानदार, अडत विक्रेते, खेडेगावातील धान्याचे शेतकरी, ज्योतिषी असा वर्ग येतो. तशी ही रास अधिकार देणारी किंवा शासकीय स्वरूपाची अथवा स्वकर्तृत्वाची नाही. ती मध्यम परिस्थितीतली सेवा वृत्तीची व आश्रीत आहे. या राशीत लक्ष्मीपेक्षा बुद्धी, कला व सौंदर्य यांचा संगम दिसून येतो.

या राशीखाली होणारे रोग फारसे कडक किंवा दाहक नसले तरी सौम्य पण जरा रेंगाळत ठेवणारे आहेत. विशेषत: पोटाचे विकार. (कारण या राशीचा अंमल लहान, मोठ्या आतड्यावर आहे.) अपचन पोटातील गॅसेस, मळमळ, ओकाऱ्या विशेषत: कोरड्या ओकाऱ्या. (कारण ही रास कोणतीही गोष्ट बाहेर ओकून टाकत नाही आतच ठेवते.) कंबर दुखणे, डोके दुखणे, अशक्तपणा, ताप, चक्कर किंवा भोवळ येणे, क्षय, शरीराची झीज होणे. त्वचेचे विकार, शरीरातील ज्ञानतंतू व मज्जातंतू दुर्बल होणे व सर्वात वाईट म्हणजे ही रास मनाची झुरणारी असल्याने त्यांना मानसिक रोग फार होतात. ह्या राशींच्या लोकांना नेहमीच आपल्याला काही तरी होते आहे असे वाटते व उगीचच रेचक व औषध घेऊन त्या आपली प्रकृती खराब करून घेतात.

रवि या राशीत मध्यम, दिसाण्यात पोरसवदा. शरीर प्रकृती किंवा अधिकार योगाला अनुकूल नाही. चंद्र या राशीत चांगला. शरीर प्रकृती बरी देतो. शरीर गोलाकार व भरलेले असते. स्वभाव व गुणधर्मालाही चांगला. मंगळ या राशीत शरीर काटक देतो. चपळ व कणखर शरीर. डॉक्टरकीच्या विद्येला चांगला. अंग लवचिक असते. बुध या राशीत फार चांगला. ती त्याची उच्चरास असल्याने शरीरकृती उत्तम भरलेली. तसेच बुद्धिमत्ता, हुशारी व शिक्षण यांना पण चांगला. या व्यक्ती चुणचुणीत व चुटचुटीत असतात. गुरू या राशीत शरीर प्रकृतीच्या दृष्टीने योग्य नाही, पण बुद्धिमत्ता उत्तम देतो. शिकण्याची कला चांगली जमते. गुरू हा अर्थशास्त्र, कॉमर्स, ज्योतिष या विषयांना चांगला शुक्र या राशीत नीचीचा असल्याने धन किंवा ऐश्वर्याच्या दृष्टीने प्रतिकुल शरीर. प्रकृती व सौंदर्याच्या दृष्टीने बरा. चेहरा सुंदर पण चेहऱ्यावर हलक्या कुळातील तेज असते. कलेच्या दृष्टीनेही तो चांगला. शनी मात्र या राशीत फार चांगला. शरीर भरलेले व पुष्ट असते. शनी हा

(पुढील मजकूर पान क्र. ३८ वर पहा.)

‘ आधुनिक पाश्चात्य वैद्यक आणि ज्योतिष ’

लेखक – डॉ. श्री. वि. करंदीकर
५२५ नारायण पेठ, पुणे ४११०३०.

पाश्चात्य वैद्यकशास्त्र, ‘ ज्योतिष ’ हे शास्त्र मानत नाही. कारण ज्योतिषातले आडाखे हे ज्ञानेंद्रियांना मिळणाऱ्या ज्ञानावर अवलंबून नाही आणि भविष्याचा वेध ज्ञानेंद्रियांनी घेता येत नाही. याउलट आधुनिक वैद्यक ‘ बाप दाखव नाही तर श्राद्ध कर. ’ अशा जातीतले आहे म्हणून ते पूर्णपणे ज्ञानेंद्रियांकडून मिळणाऱ्या संवेदनांवर बेतलेले आहे. त्यामुळे या दोन्ही शास्त्रांचे एकमेकांशी अजिबात पटत नाही.

मी पाश्चात्य वैद्यकाचा अभ्यासक असल्याने प्रथमतः माझाही ‘ ज्योतिष शास्त्र’ हे न मानण्याकडे कल होता; पण त्यामागे अभ्यास नव्हता. त्यामुळे असा ‘ अविश्वास ’ म्हणजे बहिऱ्या माणसाने ‘ संगीत ’ शास्त्र म्हणून नाकारण्यासारखे होते. गेल्या पंचवीस वर्षाचा वैद्यकशास्त्राचा अनुभव आणि अध्यात्म आणि योग या विषयांच्या अभ्यासाची जोड यामुळे हा ‘ अविश्वास ’ पातळ होत गेला.

दमा, अतिरक्तदाब, फेफरे, हृदयविकार या रोगांची खरी कारणमीमांसा आजही आधुनिक वैद्यक नीटसपणे करू शकत नाही. अशा रोगांनी पीडित होणाऱ्या व्यक्तींना या रोगाचा त्रास केव्हा होतो याची रोजनिशी मी गेली दहा–बारा वर्षे ठेवत आलो आहे. त्यातील नोंदी पाहिल्यानंतर माझ्या लक्षात असे आले की या रोगांच्या वाढीचा निश्चित संबंध हवामान, ऋतुमान आणि चंद्राच्या कला यांच्याशी आहे. अमावास्या, पौर्णिमा, पावसाळा, थंडी, उन्हाळा या ऋतुंची सुरुवात आणि अखेर, वादळे आणि भूकंप अशाप्रकारचे बदल घडले की या रोगांनी ग्रासलेल्या मंडळींनाच हमखास त्रास का होतो ? या बदलांचा अनिष्ट परिणाम इतरांवर का होत नाही ? याचे कोडे उलगडताना असे लक्षात आले की ‘ विशिष्ठ प्रकृतीच्या ’ माणसांनाच या रोगांपासून त्रास होतो. अशी ‘ विशिष्ठ प्रकृती ’ म्हणजे काय ? तर पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांचे विशिष्ठ मिश्रणच या रोगांना कारणीभूत होते. मातेच्या गर्भाच्या शरीरात हे मिश्रण कसे असते आणि वाढते कसे? या वाढीवर कशाचा परिणाम होतो ? याचा शोध घेताना असे ध्यानात आले की गर्भधारणा आणि गर्भवाढ यात आनुवंशिकतेचा वाटा जसा आहे तसाच मातेचा आहार, तिची प्रकृती, आजुबाजूची परिस्थिती, हवामान आणि ऋतुमानातील होणारे बदल हे सुद्धा कारणीभूत आहेत.

गर्भवाढीच्या काळामध्ये काही विशिष्ठ औषधे टाळावी लागतात कारण अशी औषधे या काळात मातेला दिल्यास तर त्यांच्या परिणामे जन्मणाऱ्या बालकात शारिरीक किंवा मानसिक व्यंग निर्माण होते याचाच अर्थ असा की काही रसायनांमुळे गर्भाच्या प्रकृतीमध्ये म्हणजेच पंचमहाभूतांचे मिश्रणात ढवळाढवळ होते. औषधाचे बाबतीत जे सत्य आहे सत्य आहे त्यावरून अनुवंशिकता आणि नऊ महिन्यात घडणाऱ्या हवामान आणि

ऋतुमान यामध्य होणाऱ्या बदलांमुळे अशाच प्रकारचा बिघाड गर्भाचे प्रकृतीमध्ये घडत असला पाहिजे असा तर्क काढता येतो.

जन्मकुंडली – शरीर आणि मनाच्या प्रकृतीचा आरसा –

गर्भाच्या शारीरिक घडणीमध्ये झालेले बदल जाणण्याचा उत्तम आरसा म्हणजे त्या व्यक्तीची जन्मकुंडली. गर्भधारणेपासून जन्मापर्यंत प्रत्येक महिन्याची जर कुंडली मांडली तर त्यात हवामानात होणारे बदल प्रत्येक ग्रहाच्या होणाऱ्या स्थानातील बदलातून आपल्याला पहायला मिळतील. उदा. गर्भावस्थेत समजा १० मे ८८ ते १० जुलै ८८ हा कालावधी पाहिला तर त्या काळात रवि मेष राशीत कृत्तिका नक्षत्रातून नंतर वृषभ रास पूर्ण करून मिथुन राशीत पुनर्वसु नक्षत्रापर्यंत येतो. म्हणजे या काळात गर्भावर अति उन्हाळा आणि पावसाळा या दोन्ही ऋतुमधील हवामानाचा परिणाम झाला. हा कालावधी समजा गर्भाच्या ८ व्या आणि ९ व्या महिन्यातील असेल तर त्या काळात गर्भाचे शरीर प्रकृतीत या दोन्ही ऋतुंमधील हवामानाचे खूपच परिणाम घडतील, की जे आधुनिक वैद्यक शास्त्राला ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने जाणणे शक्य होणार नाही; पण ज्योतिषशास्त्र नक्कीच असे म्हणू शकेल की या बालकाच्या जन्माचे वेळी त्याला प्राणशक्तीचा पुरवठा अपुरा झाला असेल आणि त्यामुळे भविष्यकाळात ' दमा ' यासारखा रोग उद्‌भवू शकेल.

जन्मकुंडली म्हणजे त्या नवजात बालकाने मातेच्या उदरातून या जगात प्रवेश केल्यावर पहिला श्वास जेव्हा घेतला त्या वेळेस पृथ्वीच्या संदर्भात इतर ग्रहांची स्थिती त्या नेमक्या वेळेस काय होती हे दर्शविणारा नकाशा. यात लग्नस्थानातील राशी पूर्वदिशा-दशमस्थान उर्ध्व, सप्तम–पश्चिमेकडे आणि चतुर्थस्थान ऊर्ध्व म्हणजे पाताळ दिशा दाखवते. पत्रिकेचा मध्यबिंदू पृथ्वीचे स्थान दाखवतो तर इतर स्थानात त्या वेळेला असलेले ग्रह दाखविलेले असतात. या नकाशावरून बालकाची जन्मवेळ, तिथी, ऋतु, नक्षत्र, पृथ्वीच्या संदर्भात इतर ग्रहांची स्थाने आपोआपच कळून येतात. त्या जन्मवेळेस असलेल्या हवामानातील प्राणशक्ती बालकाच्या पहिल्या श्वासाबरोबर त्याच्या शरीरांत शिरते आणि त्या शरीरातील अंतस्राव ग्रंथीची घडघाळे सुरू करते आणि त्यांचे कार्य त्या व्यक्तीच्या मृत्युपर्यंत अव्याहत चालू राहाते.

' पिंडी ते ब्रह्मांडी –

बालकाच्या जन्मवेळी जी ग्रहांची स्थिती असते त्यानुसार त्या ग्रहांचे बरे–वाईट परिणाम पृथ्वीवर होत असतात. हे परिणाम तीन प्रकारच्या ' शक्ती ' रूपात असतात. प्रत्येक ग्रहांवरून परावर्तित होणारा सूर्याचा प्रकाश ही ' प्रकाश शक्ती '. त्या ग्रहाची आकर्षून घेण्याची ' चुंबकीय शक्ती ' आणि त्या ग्रहाच्या प्राकृतिक घटनेत असणाऱ्या वेगवेगळ्या पदार्थापासून निर्माण होणारी ' आण्विक शक्ती ' अशा तीन प्रकारच्या शक्तींचा परिणाम ग्रहांमध्ये आपापसात आणि सामुदायिकरीत्या पृथ्वीवर होत असतो. त्या परिणामांना ज्योतिषशास्त्रात ' योग असे म्हटले आहे आणि हे परिणाम किंवा योग शुभ किंवा अशुभ हे पाहण्यासाठी पृथ्वीच्या संदर्भात या ग्रहांची स्थिती कोणत्या कोनात आहे यावरून ठरवले जाते. शनी मंगळाचे दृष्टीयोग या कोनांवरच अवलंबून असतात. हे सर्व ग्रह सूर्याभोवती फिरत असल्यामुळे या शक्तींचा होणारा परिणाम रोज बदलत असतो. शीघ्र गतीने फिरणाऱ्या बुध, शुक्र, मंगळ या ग्रहांचे परिणामातील बदलही शीघ्रतेने अनुभवता येतात. याउलट गुरू शनीसारख्या मंदगतीच्या ग्रहांचे परिणाम लक्षात येण्यास जास्त कालावधी लागतो. ब्रह्मांडात होणारे हे बदल आणि त्यापासून होणारे परिणाम तसेच्या तसेच ' पिंड ' स्वरूपात असलेल्या, पृथ्वीचा अंश असलेल्या मानवी देहावर सूक्ष्म रीतीने होत असतात. प्रत्येक ग्रहाचे प्रातिनिधिक स्वरूप मानवी शरीरात उपस्थित असते आणि कार्यही करत असते. त्यांच्या एकत्रित परिणामातून शरीराची वाढ आणि झीज होत असते. ग्रहांच्या परिणामाबरोबरच प्रत्येक राशीत स्थित असलेल्या नक्षत्र रूपात असलेल्या स्थिर तारकापुंजांचाही बरा–वाईट परिणाम पृथ्वीवर आणि त्यामुळे मानवी शरीरावर घडत असतो. उदा.कृत्तिका नक्षत्रात रवि असताना जन्मलेल्या बालकात उष्णता एवढी प्रचंड असते की त्या बालकाचे दात सुध्दा किडतात. या उलट आर्द्रा नक्षत्रात जन्मलेल्या बालकाचे शरीरात प्राणशक्तीच्या अभावामुळे दम्यासारखे विकार बळावतात. नक्षत्रांच्या शुभ अशुभ परिणाम घडवणाऱ्या शक्तींचे नक्की स्वरूप सांगणे आज तरी अवघड आहे.

शरीररूपी ब्रह्मांडाचा नकाशा ' जन्मलग्न कुंडली ' –

मानवी शरीरात असलेल्या कोट्यावधी पेशींमुळे या शरीरालाच ब्रह्मांडाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्याचे यथार्थ वर्णन ' पुरुष सूक्तात आले आहे. या ब्रह्मांडात वेगवेगळे ग्रह निरनिराळ्या ग्रंथांच्या रूपातून वेगवेगळ्या शक्ती निर्माण करीत असतात त्यांचे आपापसातील सुखद संबंध ' शारीरिक आरोग्य ' देतात तर दुःखद संबंध निरनिराळे रोग निर्माण करतात.

रवि किंवा सूर्य जगाला जशी चेतना देतो तशीच चेतना शरीरातील रवि ॲड्रिनल ग्रंथीतून निर्माण होणारे ॲड्रिनॅलिन आणि स्वादुपिंडातून निर्माण होणारे इन्शुलिन या दोन स्रावांच्या एकत्रित परिणामातून मिळते. ॲड्रिनॅलिन रक्तवाहिन्यावर नियंत्रण ठेवून प्राणवायूचा पुरवठा नियंत्रित करते तर इन्शुलिन ' अन्नपदार्थातील ग्लुकोजच्या ज्वलनातून शक्ती निर्मिती करते. हे दोन्ही अंतःस्राव एकाच नाण्याच्या बाजू आहेत. यांच्या सुरळीत चालणाऱ्या कार्यामुळे शरीरातील प्रत्येक पेशीला जगण्यासाठी आवश्यक असणारी ' उर्जा ' निर्माण करता येते. ऋतुमानात होणाऱ्या बदलानुसार ही ' उर्जा ' कमी-अधिक होते. या प्रक्रियेवर भावनिक नियंत्रण ठेवते. मेंदूमधील मस्तिष्क ग्रंथी ' हायपोथॅलॅमस ' राग, दुःख, आनंद, समाधान, वैषम्य या भावनांच्या स्फुरण्यामुळे ही ग्रंथी कमी अधिक

कार्यक्षम होते म्हणून या ग्रंथीला 'चंद्र' हे नाव देता येते. याशिवाय गळ्यात असणाऱ्या थॉयरॉईड ग्रंथीपासून निर्माण होणारा स्राव शरीरात 'धडाडी' निर्माण करतो. लाल रंगाचे आयोडीन या स्रावात प्रामुख्याने असते म्हणून या उर्जेला 'मंगळ' म्हणता येईल. ब्रह्मांडातील सर्व ग्रहांचे गतीवर जसे 'गुरू' चे नियंत्रण असते तसेच शरीरातील सर्व स्राव स्वरूपातील 'उर्जा' वर नियंत्रण ठेवण्याचे काम मेंदूमधील 'पिट्युटरी ग्रंथी' करते म्हणून या ग्रंथीच्या स्रावरूपी उर्जेला 'गुरू' म्हणावे शरीरात लैंगिक वाढ करणे आणि त्या वासना जागृत ठेवण्याचे कार्य रजोपिंड आणि पुरुष बीज पिंडे (टेस्टीज) करतात म्हणून त्यांच्यापासून निर्माण होणाऱ्या 'स्राव उर्जेला' शुक्र ही संज्ञा देता येईल. मेंदूतील सर्व पेशी जागृत अवस्थेत ठेवणाऱ्या विद्युत उर्जेला 'बुध' म्हणता येईल तर शरीरातील पाणी आणि सोडियम व पोटॅशियम या खनिजांच्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या 'ॲड्रिनल कॉर्टेक्स' या ग्रंथीच्या स्राव उर्जेला 'शनि' म्हणता येईल. राहू व केतू हे छायाग्रह आहेत म्हणून जन्मकुंडलीत ते ज्या स्थानी असतील त्या स्थानात असलेल्या ग्रहांचे कार्यात ते अडथळा आणतात. राहू अल्ट्राव्हायोलेट उर्जा देतो म्हणून त्याला 'शनिवद् राहू' असे म्हटले आहे तर केतू 'इन्फ्रारेड उर्जा' देतो म्हणून त्याला 'कुजवद् केतु' (मंगळाप्रमाणे) असे म्हटले आहे.

'या सर्व उर्जा' ज्या ग्रहांपासून येतात ते ग्रह जन्मलग्नकुंडलीत ज्या राशीत स्थित आहेत त्या राशींच्या गुणधर्मानुसार या स्राव उर्जेत बदल घडतात. हे बदल त्या राशीतील नक्षत्रामुळे घडत असले पाहिजेत म्हणून नक्षत्रांचे 'शुभाशुभ' त्यावरून त्यांचे बरे वाईट परिणाम घडून येतात.

वर वर्णन केलेल्या सर्व 'स्राव उर्जा' आणि ग्रहांच्या अंतःस्राव ग्रंथी या माझ्या व्यावसायिक अनुभवजन्य ज्ञानाच्या मंथनातून आलेल्या आहेत. प्रदीर्घ संशोधन आणि अनुभव यामधून यांचे कार्यावर जास्त प्रकाश पडेल; पण उर्जेचे शरीरातील स्थानात काही बदल करावा लागेल असे वाटत नाही.

मी व्यक्त केलेले विचार ज्योतिषशास्त्रातील ज्येष्ठ अभ्यासकांना आणि वैद्यकशास्त्रातील तज्ज्ञांना मान्य होतीलच अशी खात्री मला नाही, पण एक नवीन 'समांतर विचारसरणी' म्हणून याचा सहानुभूतिपूर्वक विचार करतील अशी आशा आहे.

(पान क्र. ३५ वरून पुढे चालू)

बुद्धिमता, शिक्षण व्यापार व धन यांच्या दृष्टीनेही चांगला. चिकाटी, निश्चय, परिश्रम चांगली असते. राहूला ही रास स्वगृह असल्याने फार चांगली. शरीरप्रकृती उत्तम असते. चेहरा पण आकर्षक व देखणा असतो. धन व अधिकार बरा मिळतो. राहू हा कला, जादू, बुद्धिमता व शिक्षण यांच्या दृष्टीने चांगला. केतू या राशीत फारसा योग्य नसतो. मात्र तो फार वाईटही नसतो. आध्यात्मिक परमार्थिक दैविक विद्येच्या दृष्टीने उत्तम. हर्षल हा शरीरप्रकृतीच्या दृष्टीने मध्यम, पण बुद्धिमतेच्या दृष्टीने बरा. नेपच्यून, अंतरस्फूर्ती, गूढविद्या ध्यानधारणा यांना चांगला. चेहऱ्यावर सुंदर प्रभाव भोवती वलय असते.

या राशीचे हवामान चंद्र, बुध, शनि व राहू व नेपच्यून यांना चांगलेच मानवते. हे ग्रह या राशीत शरीरप्रकृती बरी देतात. तर रवि, मंगळ, गुरू, केतू व हर्षल यांना हवामान मानवत नाही. गुरू या राशीत बुद्धिमता उत्तम देतो, पण अशक्तपणा व अपचनाचे विकार दाखवतो.

या राशीचे आकर्षण चंद्र बुध, गुरू, शनि व राहू यांना आहे. चंद्राला निसर्ग, सौंदर्य व हिरवेगारपणा म्हणून बुधाला उत्तम बुद्धिमता व व्यवहार म्हणून गुरूला उत्तम बुद्धिमता आहे म्हणून शनीला व्यापाराला वाव आहे म्हणून तर राहूला मंगल व कलाकौशल्य म्हणून आकर्षक आहे रवि, मंगळ, केतू, हर्षल, शुक्र यांना मात्र या राशीचे आकर्षण नाही.

या राशीचे हस्ताक्षर सुंदर, वळणदार, गोलाकार व एकसारखे दर्शविते. लिहिणेही सहजगत्या असते. या राशीवर ५ व ६ या अंकाचे वर्चस्व आहे व बुधाचा पांचू किंवा मोती उत्तम, लाभदायक असतो.

या राशीचे शिक्षणाचे व्यवहारिक विषय म्हणजे कॉमर्स, अर्थशास्त्र, जमाखर्च, बँकींग, चित्रकला, आर्किटेक्ट, डॉक्टर, टायपिंग शॉर्टहॅन्ड, पत्रकार, आर्टस हे आहेत.

ही रास थोडी रजोपण शुभगुणधर्मी व बौध्दिक असल्याने त्यांचे वृषभ, मिथुन, कर्क, तुळ, कुंभ यांच्याशी व त्या खालोखाल धनु व मीन यांच्याशी चांगले जमेल. मेष, सिंह, वृश्चिक, मकर यांच्याशी जमणे कठीण. तसेच चंद्र व गंबली, बुधवर्गबली, गुरूवर्गबली व त्या खालोखाल शुक्रवर्गबली लोकांशी चांगले जमेल. पण रवि मंगळ, केतू किंवा शनिवर्गबली लोकांशी जमणार नाही. वधुवर गुण मिलनाच्यावेळी या गोष्टींचा विचार करावा.

पुढील लेखात आपण सौंदर्य कला संपती यांनी भरलेली, पण रजोगुणी अशा शुक्राच्या तुळ राशीची माहिती पाहू.

नवमांशाचा नवमांश कुंडली

लेखक - सदाशिव हरि गोखले

९६४-अ, अंकली रस्ता, गाव भाग, सांगली ४१६४१६.

ज्योतिष शास्त्रात लग्न कुंडली हाच आधार धरून भविष्याचा पुढील डोलारा उभा केला जातो. त्यात आणखी भर म्हणजे नवमांश कुंडली पाहण्याची पद्धत. कारण मूळ पत्रिकेत एखादा ग्रह बिघडला असेल व तो नवमांश कुंडलीत तो सुधारला असेल, किंवा एखादा ग्रह मूळ कुंडलीत चांगला असेल, पण नवमांश कुडलीत जर बिघडला असेल तर फलितावर त्याचा परिणाम होतो, असे समजून चालले जाते आणि ते बरोबरही आहे. त्याचप्रमाणे षोडष वर्ग कुंडल्या मांडून ग्रहांचे बलाबल पाहण्याची पद्धतही आहे. मी आज-अशीच एक नवीन पद्धत वाचकांपुढे ठेवणार आहे. ती पद्धत पुस्तकामधून सुद्धा कोठे कोठे दिलेली आढळते; पण त्याचा वापर मात्र करताना दिसून येत नाही. माझ्या समजुतीने न न कुंडली मांडल्यास ग्रहांचे बल व फलित वर्तविण्यास जास्त सुलभता येईल. काही वेळेला कुंडली वरवर अगदी सामान्य नवमांश कुंडलीवरूनसुद्धा तितका अंदाज येत नाही. तेव्हा न न कुंडली जास्त अचूक उत्तर देईल असे वाटते. ती पद्धत म्हणजे नवमांशाचा नवमांश कुंडली होय. त्या पद्धतीने प्रसिद्ध असलेल्या दोन कुंडल्या काही घटनासह सोडवून दाखविल्या आहेत.

पुस्तकामधून नवमांशाचा नवमांश काढण्याची पद्धत थोडी निराळी असण्याचा संभव आहे. माझी पद्धत अगदी नवमांश कुंडली जशी मांडली जाते तशीच नवमांशाचा नवमांश कुंडली मांडण्याची आहे. थोडे कळण्यासाठी दोन उदाहरणे देतो, एका राशीचे नऊ नवमांश असतात म्हणजे एक नवमांश तीन अंश वीस कला म्हणजेच २०० कलांचा असतो, त्याचा पुन्हा नवमांश म्हणजे एक न. न. २२ कला १३ विकला २० प्रतिविकला एवढा येईल. समजा एकाचे मेष लग्न आहे व ते वृषभ नवमांशात आहे तर त्याचा सुरुवातीचा न न मकर येईल पुढील न न कुंभ येईल. असे २२-१३.२० चा एक एक नवमांशाचा येईल किंवा मेष लग्न आहे व तो मिथुन नवमांशात आहे तर त्याचा पहिला न न तूळच येईल, म्हणजे जशी नवमांश कुंडली तयार करतात तशीच प्रथम नवमांश कुंडली नंतर त्या नवमांश कुंडलीची नवमांश कुंडली. पहिल्या पहिल्या प्रथम काढणे थोडे कठीण वाटेल. एक तक्ता तयार करून ठेवल्यास सोपे जाईल. पुढे अंगवळणी पडेल व अवघड वाटणार नाही.

एक एक न न हा २२-१३-२० चा असल्याने लग्न मात्र अचूक काढले पाहिजे, वाचक म्हणतील इतके अचूक लग्न कसे मिळावयाचे कारण लग्नाची जन्माची वेळ अगदी अचूक असत नाही. एखादे मिनीटाचा फरक पडला तर चुकणार. त्यांचे म्हणणे बरोबर आहे पण काही ठोकताळ्यावरून ते थोडे मागेपुढे करून घेता येणे शक्य आहे. ग्रहांच्या बाबतीत एखाद्या मिनीट दोन मिनीटांनी फरक पडणार नाही. लग्न काढताना अक्षांश १६अं-४५' असल्यास १७ अक्षांशाचे जंत्रीवरून काढून मग फरक करून काढणे इष्ट. नुसते अंदाजे उपयोगी नाही हे खरे. जर कदाचित लग्न अचूक नसले तरी ग्रहामध्ये होणारे शुभयोग अशुभ हे तरी कळतील व नंतर लग्न शुद्ध करण्यास मदत होईल.

न न मध्ये होणारे योग हे अगदी अंशतुल्य होतात. अशा योगाना जास्त महत्त्व आहे. मग ते योग शुभ असोत अशुभ असोत.


न न कुंडलीवरून जुळी मुले ह्यातील फरक, उद्योग धंद्यातील फरक, हे सूक्ष्म पाहण्यास जास्त उपयोगी पडेल असे वाटते. कृष्णमूर्ती पद्धतीमध्ये २४९ भाग पडतात. ह्यात आणखी सूक्ष्म भाग पडतात, ९७२ पडतात; प्रश्नकुंडलीवरून भविष्य वर्तविण्यास सुद्धा जास्त उपयोगी पडेल ह्याचा विचार पुढे केव्हा तरी यथावकाश.

आज मी ह्या खाली दोन कुंडल्या सोडविल्या आहेत. त्यातील काही प्रमुख घटनासह. एक आहे कै. इंदिराजी व दुसरी पंतप्रधान राजीव गांधी यांची. ह्या घटना दोन कुंडल्या घेण्याचे प्रयोजन कारण सर्वांना विदीत आहेत, ही एक गोष्ट. दुसरी म्हणजे दोघांच्या जीवनात काही घटना एकाच वेळी घडल्या आहेत हे.

प्रथम मी हे सांगतो की उभयतांच्या ज्या मी कुंडल्या घेतल्या आहेत त्या माझ्या संग्रहात असलेल्या. त्याचे अंश माझ्याकडे असलेले आहेत ते प्रमाणभूत धरून माझे उत्तर आहे. ज्यांना मी आधारभूत धरलेल्या कुंडल्या चुकीच्या वाटत असती ल त्यांनी आपल्या जवळील आधारावर सोडवाव्या. मी नुसते मार्गदर्शन करतो आहे. ह्यात काही त्रुटी राहिल्या असतील मी नाही म्हणत नाही. वाचकांनी त्याचा विचार करावा. सूचना कराव्यात. उपयुक्त वाटल्यास त्यात बदल करणे शक्य होईल . योग्य अयोग्य याचा विचार करावा. माझा आग्रह कोणताच नाही. उपयोगी वाटल्यास स्वीकार करावा.

' यत्रोच्यते तत्ग्राह्य यत् न रोच्यते तत् त्याज्यं '

न न कुंडली –




ग्रहांचे अक्ष –

लग्न	रवी	चंद्र	मंगळ	बुध	गुरू	शुक्र	शनी	राहू	केतू
३	५	९	४	७	१	८	३	८	२
।	४	५	१६	१३	१५	२१	२१	१०	१०
२७									
।	८	३६	२४	१६	२	२	४९	३५	३५
२०	३९	४१							


माजी पंतप्रधान इंदिराजी गांधी –

१९–११–१९१७ रात्री ११–११




पंतप्रधान राजीव गांधी

२०–८–४४ सकाळी ८–२५



न. न. कुंडली –



ग्रहांचे अंश

लग्न	रवी	चंद्र	मंगळ	बुध	गुरू	शुक्र	शनी	राहू	केतू
५	४	४	५	४	४	४	२	३	९
२	३	१७	१	२८	१२	१८	१४	२	२
४	४९	४१	९	१४	६	३९	९	४४	४४

हर्षल नेपच्यूनचा विचार केला नाही –

श्रीमती इंदिराजींच्या कुंडलीवरून पंतप्रधानपद भूषविण्या इतके बलिष्ट योग पाहता दिसून येत नाहीत. फक्त मंगळ कर्क लग्नाला व तीन परिवर्तन योग. त्यातील एक चांगला इतर दोन सामान्य, पण तीच न न कुंडली पहा. कर्क लग्नाला राजयोगकारक मंगळ व लग्नेश चन्द्र यांचा न न कुन्डलीमध्ये त्रिकोणयोग अंशात्मक. न न कुन्डलीमध्ये सिंह लग्नाला राजयोगकारक मंगळ व त्याचा चंद्राशी त्रिकोण. रवी लग्नाचा अधिपती त्याचा समसप्तम. मूळ लग्न न न मध्ये सिंह म्हणजे राशी अनुराधाने पराक्रम. गुरू शनी मोठे ग्रह त्याची दशमात युती. रवी चंद्राचा योग. बुध चंद्राचा त्रिएकादश योग . शुक्रचंद्र त्रिकोण. मूळ कुंडलीत सप्तम भाव दूषित तसाच न न मध्ये दूषित, बुध स्वगृहीचा. लग्नेश रवी लाभेश बुध युतीत. शनीची चतुर्थावर व सप्तमावर दृष्टी. वरील योगापेक्षा दोन आणखी श्रेष्ठ योग झाले आहेत ते असे धर्मकर्म संबंध भाग्येश मंगळ व दशमेश शुक्र याची युती पंचमात. तसाच धर्मकर्म संबंध चंद्रापासून सुद्धा गुरू शनि युती चंद्राच्या द्वितीयात. आणखी एक योग म्हणजे दशम पंचम-मधील परिवर्तनयोग. इतके चांगले योग न न कुन्डलीत दिसून येतात. ह्यावरून न न कुंडलीवरून अनुमान काढण्यास काही अडचण येईल असे वाटत नाही.

आता पंतप्रधान राजीव यांची कुंडली पाहू.

त्यांच्या कुंडलीकडे पाहिले तर पंचग्रह व्ययभावामध्ये, तथापि त्यांच्या कुंडलीत धर्मकर्मसंबंध तीन तऱ्हेने झालेले आहेत; पण ते अंशात्मक घडत नाहीत; पण न कुंडलीमध्ये हे धर्मकर्मसंबंध दशमेश गुरू नवमेश शनी अंशात्मक युती. चंद्रापासून नवम दशम गुरू मंगळ अंशात्मक त्रिकोण. रवीपासून शुक्र मंगळ त्रिएकादश असे श्रेष्ठ योग दिसून येतात. शिवाय गुरू रवी, रविमंगळ, त्रिएकादश. दशमेश आपल्या दशमात. चंद्राचा दशमेश दशमात चंद्राच्या दशमात गुरू शनी हे दोन बलाढ्य ग्रह. मातोश्रींचा वारसाच की काय गुरू शनी युती. इतके बहुविध शुभयोग न न कुंडलीत होतात. काही अशुभ योगही आहेत. रवी राहूने व बुध केतूने बिघडला आहे त्याची फलेही मिळाली आहेत. अगर मिळतील. त्याबद्दल विशेष भाष्य करत नाही.

आता काही घटना पाहू.

१) श्रीमती इंदिराजींच्या मातोश्रींचे निधन – १८–२–३६ त्यादिवशीची ग्रहस्थिती. रवि कुंभ, मंगळमीन, गुरू वृश्चिक, शनी-कुंभ, राहूधन, चंद्रधन. शनीची चतुर्थावर दृष्टी, शनीची चंद्रावर दृष्टी, राहूचे मूळ कुंडलीतील मातृकारक चतुर्थस्थानाचा मालक जो शुक्र त्यावरून भ्रमण. त्यादिवशी चंद्रधन त्यावरून राहूचे भ्रमण; न न कुंडलीतील चतुर्थेश मंगळ त्याचे अष्टमातून भ्रमण. रवीचे भ्रमण. सप्तमातून केतूवरून.

२) पंतप्रधान राजीव यांचा जन्म श्रीमती इंदिराजींच्या जीवनातील आनंदाचा क्षण. भावी पंतप्रधानाची स्वप्ने. २०–८–४४ ग्रहस्थिती इंदिराजींच्या न न कुंडलीत पंचग्रही रवी चंद्र बुध गुरू शुक्र. चंद्राबरोबर शुक्राबरोबर मंगळाबरोबर त्रिकोण योग. इतके शुभयोग. पण रवीवरून शनीचे भ्रमण व लग्नावर शनीची दृष्टी हा एक कुयोग. त्याची फळे काय मिळाली त्याची मात्र कल्पना नाही, चंद्रापासून पंचमात पंचग्रही.

३) फिरोज गांधीचे निधन : ८–९–६० ग्रहस्थिती रवी सिंह गुरू धन, शनिधन राहू सिंह, मंगळ मिथुन. केतु कुंभ, सप्तमातून केतूचे भ्रमण. केतूवरून शनी धनराशीला त्याची सप्तमावर दृष्टी. रवी पतिकारक त्याचे राहूवरून भ्रमण. किंवा रवीवरून राहूचे भ्रमण. मंग-ळाचे रवीवरून भ्रमण. सप्तमेश शनी त्यावर मंगळाची दृष्टी. मंगळावर शनीची दृष्टी. गुरूची दृष्टी सप्तमावर नाही. सप्तमेश शनी वक्री. हीच घटना राजीव गांधींच्या कुंडलीत पाहू. पितृकारक रवी त्याचे केतूवरून भ्रमण. रवीवरून राहूचे भ्रमण. रवीवर शनीची दृष्टी. न न कुंडलीतील दशमेश गुरू त्यावर मंगळाची दृष्टी जन्मकुंडलीतील दशमेश बुध त्यावरून केतूची भ्रमण (न न कुंडली).

४) श्रीमती इंदिराजी पंतप्रधान झाल्या २४-१-६६ ग्रहस्थिती रवी मकर, मंगळ कुंभ, गुरू वृषभ, शनीकुंभ, राहू वृषभ, चंद्राला मंगळ शनी अकरावे, गुरू दुसरा, त्यादिवशी चंद्रसुद्धा अकरावा असावा. रवी दहावा, गुरू शनीवरून गुरूचे भ्रमण. शुक्र दशमात, चंद्राच्या लग्नेश रवी दशमेश शुक्र युतीत, गुरूरवी गुरूशुक्र, शनिरवी शनिशुक्र त्रिकोण त्यादिवशी शनि मंगळाचे केतूवरून भ्रमण हा एक कुयोग सप्तमात होत होता. त्याची अनिष्ट फळे यापूर्वी मिळाली आहेत म्हणून आता नाहीत असे म्हणावे लागेल.

५) श्रीमती इंदिराजींचा निवडणूकीत पराभव २२-३-७७ रवि मीन, मंगळ कुंभ, गुरू वृषभ, शुक्र मीन, शनिकर्क (व) राहू तूळ, केतू तूळ, लग्नेश रविच्या अष्टमातून भ्रमण, दशमेश शुक्राचे सुद्धा अष्टमातून भ्रमण. शनिच्या व्ययातून भ्रमण (व) आणखी म्हणजे केतूचे चंद्रावरून भ्रमण. चंद्रसुद्धा अष्टमातून जात होता. एकटा गुरू तेवढा चांगला होता, पण त्यावर मंगळाची दृष्टी लग्नावर दृष्टी, चंद्रावर शनिची दृष्टी.

६) श्रीमती इंदिराजींचे दुःखद निधन व राजीव गांधीचे पंतप्रधान स्वीकार. ग्रहस्थिती रवि तूळ, चंद्र मकर, मंगळ धन, बुध-तुळ, गुरू धन, शुक्र वृश्चिक, शनि तूळ, राहू वृषभ, केतू वृश्चिक सप्तमेश (मारकेश) शनि द्वितीयेश (मारकेश) बुध व लग्नेश रवि यांचे तृतीयापासून भ्रमण हे मरणाला कारणीभूत आहेत. चंद्रावर शनिची दृष्टी शनि रवि हे अपघाती मरण दाखवतील. मंगळाचे धनु राशीतून भ्रमण, त्याची अष्टमावर दृष्टी लग्नेश रविवर दृष्टी.

आता मातोश्रींचे निधन पाहू. सप्तमातून मंगळाचे भ्रमण त्याची दृष्टी मातृकारक शुक्र व चंद्रावर. लग्न कुंडलीतील चतुर्थेश गुरू त्यावरून मंगळाचे भ्रमण, त्यावर शनिची दृष्टी, न न कुंडलीतील चतुर्थेश बुध व शनि युती शनि, मंगळ समसप्तम.

आता अधिकार ग्रहण

दशमाचा मालकाचे म्हणजे गुरूच्या दशमाच्या दशनातून भ्रमण हा मोठा योगायोग, गज केसरी योग. न न कुंडलीत गुरू-चलित व मूळ मंगळ याचा त्रिकोण. म्हणजे काही योग मातोश्रींचे निधनास कारणीभूत. दशम भाग्य संबंधीत अधिकार प्राप्ती. धर्मकर्म संबंध दशमेश गुरू भाग्येश शनि त्रिएकादश योग. गुरू रवि त्रिकोण.

मी पुष्कळ घटना दिल्या आहेत. बरेवाईट वाचकांनी ठरवायचे आहे. प्रथम मी म्हटले आहेच काही त्रुटी राहिल्या असतील वाचकांनी कळविल्यास जास्त लक्ष घालता येईल. प्रत्यक्ष घटना घडल्या त्यादिवशी ग्रह नवमांशाच्या नवमांशात कसे होत हा ह्या पुढचा जास्त खोलातील विचार होईल व जास्त अचूकता येईल. तूर्त एवढे पुरे. पुढे केव्हातरी जास्त लिहिन.

राजीव गांधीजींची पिह लग्नाची कुंडलीही प्रसिद्ध आहे. त्यावरून सुद्धा काय काय निष्पन्न होते तेही वाटल्यास पहावे वर मी त्याचा खुलासा केला आहेच.

या अंकापासून ग्रहांकित मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ६० करण्यात आली असून दरमहाच्या अंकाची किंमत रु. ७ करण्यात आली आहे, तरी सर्व वाचकांनी व वर्गणीदारांनी याची नोंद घ्यावी.

संपादक